राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2022-23

प्राथमिक शिक्षक गट

| शैक्षणिक नवोपक्रमाचे नाव |

# 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल'

....देऊ अधिकार प्रत्येक कळीस फुलण्याचा व खुलण्याचा.

| उपक्रम सादरकर्ते |

श्री. सचिन कुंडलिक देसाई (सहशिक्षक)

विद्या मंदिर बशाचामोळा

ता. भुदरगड जि. कोल्हापूर

मार्गदर्शक : मा. सरिता मोरे

(अधिव्याख्याता, डायट कोल्हापूर)

SCAN /CLICK

# | शिक्षक माहिती



- **नवोपक्रम शीर्षक** : 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल'
  ....देऊ अधिकार त्या प्रत्येक कळीस फुलण्याचा आणि खुलण्याचा.
- **नवोपक्रमकर्त्याचे नाव :** श्री. सचिन कुंडलिक देसाई
- **कार्यालय** : विद्या मंदिर बशाचामोळा
  ता. भुदरगड जि. कोल्हापूर
- **पदनाम** : सहशिक्षक
- **नवोपक्रम गट** : प्राथमिक शिक्षक गट
- **शैक्षणिक अर्हता** : M.A.D.Ed
- **जन्मतारीख** : १६ डिसेंबर १९८४ (एकूण वय ३७ वर्षे ११ महिने)
- **सेवारंभ** : १० नोव्हे. २००५ (एकूण सेवा १७ वर्षे ० महिने)
- **शाळा रुजू दिनांक** : २९ जून २०१९ (एकूण सेवा ३ वर्षे ६महिने)
- **कायमचा पत्ता** : मु. पो. मिणचे खुर्द
  ता. भुदरगड जि.कोल्हापूर पिन-४१६२२३
- **संपर्क क्रमांक** : ९४२१११४२९०
- **ई-मेल** : skdesai011@gmail.com
- **ब्लॉग** : www.desaisachin.blogpot.in
- **नवोपक्रमसाठी लागलेला कालावधी :** ६ महिने
- **नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या :** ४४

# प्रास्ताविक

सस्नेह वंदे !

इयत्ता १ ली कक्षा ही जर शिक्षणामधील पहिले महत्वपूर्ण पाऊल असेल तर इयत्ता २ री कक्षा देखील नक्कीच दुसरे महत्वपूर्ण असे पाऊल असल्याची आपणास जाणीव असायला हवी. पहिलीमध्ये दाखल झालेल्या मुलाचा 'शैक्षणिक पाया मजबूत करणे' हे महत्वपूर्ण उद्दिष्ट राहते आणि तेच मूल दुसरीच्या वर्गात प्रवेश केल्यावर त्याला प्रथमच बोध झालेल्या सर्व क्षमता आणि कौशल्ये दृढ होणे खूप आवश्यक आहे. अर्थात ही अध्ययन प्रणाली आनंददायी असणे खूप आवश्यक आहे.

'शिकणे' हा मुलाचा जितका मुलभूत अधिकार आहे तितकेच ते शिक्षण आनंददायी करणे, मुलांना शिकण्यात आवड निर्माण करणे हे आपले शैक्षणिक कर्तव्य आहे. या दुसऱ्या आणि महत्वपूर्ण टप्प्यात मुलांनी किमान अध्ययन क्षमताप्राप्ती बरोबरच मुलांच्यामध्ये ज्ञान शोधण्याची वृत्ती, आत्मविश्वास, मुल्याशिक्षण यासह जीवनकौशल्याचेही पायाभूत व प्राथमिक ज्ञान यांचे संक्रमण होणे खूप आवश्यक आहे. दुसरीच्या वर्गात आलेले मूल वाचायला शिकलेले असते पण योग्य गतीत व योग्य आरोह अवरोहसह आत्मविश्वासपूर्वक वाचता येणे आवश्यक असते. हे मूल लिहायला शिकले असते पण हे लेखन सुलेखन असणे व शुद्ध व प्रमाणबद्ध लिहायला शिकणे या टप्प्यात गरजेचे असते. या शिवाय हे मूल बोलायला, विचार व्यक्त करायला शिकले असते पण हे विचार आत्मविश्वासपूर्वक मांडणे, प्रत्येक गोष्टीमागील कारणांचा स्वतःहून शोध घेणे आदी गुणांचा विकास होणे खूप आवश्यक असते. सर्वात महत्वाचे म्हणजे बालकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण याच काळात होत असल्याने मुलांच्या मनावर चांगल्या विचारांचा प्रभाव टाकणे, मुलांच्यात सुसंस्कार रुजतील असे वातावरण निर्माण करणे आवश्यक ठरते. एकप्रकारे मुलाच्या शिक्षणप्रवासातील या दुसऱ्या कक्षेत एका आनंदी वातावरणात मुलांचा सर्वागीण विकास साधण्याचा विशेष प्रयत्न करणे पुढील शैक्षणिक वाटचालीच्या दृष्टीने अत्यावशक ठरते. याच विचारप्रणालीमधून या सर्व गोष्टींची साध्यता सुयोग्य वातावरण करून देणारा नवोपक्रम म्हणजे 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल'

गत शैक्षणिक वर्षात कोरोनासारख्या आपत्ती काळात पहिलीमध्ये दाखल झालेल्या मुलांना शाळा बंद काळातही शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, सर्व दाखल मुले शिक्षणाच्या प्रवाहात टिकून रहावीत यासाठी राबवलेला विशेष नवोपक्रम... 'पक्का पाया पहिलीचा' हा उपक्रम राज्यातील अन्य शाळांना देखील अनुकरणीय आणि दिशादर्शक ठरला होता; शिवाय गतवर्षी त्यास शासकीय राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सुयश देखील प्राप्त झाले होते. याच कक्षेतील मुलांच्यामध्ये पुढील इयत्ता दुसरीच्या वर्गात आलेवर एक वर्गशिक्षक या भूमिकेतून जाणवलेल्या नवीन समस्या व सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नवविचार करून नाविन्यपूर्ण कृती कार्यक्रमांची नियोजनबद्ध आखणी व कार्यवाही या शैक्षणिक सत्रात करण्यात आली. पर्यवेक्षीय यंत्रणा यांचे सुयोग्य मार्गदर्शन तर पालकवर्ग व समाज यांचे सुयोग्य सहकार्य नवोपक्रमाच्या यशस्वीतेसाठी लाभदायक ठरले. विद्यार्थी जडणघडणीच्या अर्थात आकार देण्याच्या प्रक्रियेतील या महत्वपूर्ण टप्प्यात मुलांच्यात अपेक्षित वर्तनबदल या नवोपक्रमामुळे साध्य करता आला. सर्वात महत्वाचे म्हणजे.. हे सर्व मुलांना एका विशिष्ट आनंदी वातावरणात देऊ शिकतो, मुले आनंदात सर्व गोष्टी साध्य करू शकतात. शिक्षणातून मिळणारा आनंद हा नवीन शिक्षण घेण्यास रुची वाढवणारा व अध्ययन प्रक्रिया सहज सुलभपणे होण्यास साह्यभूत ठरते हे मी नवोपक्रमाच्या अनुभवातून साध्य केले आहे.

अशाप्रकारे प्रारंभिक स्तरावर असताना मुलांच्यामध्ये अपेक्षित असणारी शैक्षणिक, बौद्धिक, भावनिक  सामिजिक विकासपूरक उद्दिष्टे साध्य करण्याचा दृष्टीने योग्य वातावरणात पायाभरणी करण्याचे कार्य या नवोपक्रमामुळे प्रत्येक बालकात साध्य होईल याचीही मला खात्री आहे. २१ व्या शतकातील आव्हांनाना सामोरे जाणाऱ्या या भावी पिढीला तंत्रज्ञानाची कास धरण्याची व भविष्याचा वेध घेण्याच्या विचारप्रणालीचे एक प्रकारे बिजारोपण घालण्याचे काम या नवोपक्रमातून साध्य होऊ शकतो, याचा  मला विश्वासही आहे. आज या नवोपक्रम स्पर्धेच्या निमित्ताने सादर करत असलेला हा नवोपक्रम सर्वांच्यासाठी दिशादर्शक आणि अनुकरणीय असा आहे. बालकाचा सर्वांगीण विकास साधताना त्याला परिसराची जाणीव, मुलभूत जीवनकौशल्याची ओळख व मनावर सुसंकार बिंबवण्याचे कार्य या नवोपक्रमामधून सहजपणे साध्य झाले.  पालक, समज व शाळा यांच्या समन्वयातून यशस्वी ठरत असलेला नवोपक्रम म्हणजे शिक्षणरुपी बागेतील त्या सर्व कळ्यांना फुलण्यास व खुलण्यास आल्हाददायक वातावरण निर्माण करून देणारा आहे. शिक्षण प्रणालीमध्ये ‘निरसता’ ऐवजी ‘आवड’ निर्माण करणाऱ्या, आनंदी शिक्षणास मूर्त स्वरूप देणाऱ्या ह्या दिशादर्शक नवोपक्रमाचा प्रवास अन् त्याची यशस्विता आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

सचिन देसाई

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ ) | नवोपक्रमाचे शीर्षक | १ |
| २ ) | नवोपक्रमाची गरज व महत्व | २ |
| ३ ) | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ४ |
| ४ ) | नवोपक्रमाचे नियोजन | ५ |
| ५ ) | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १२ |
| ६ ) | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती ( उद्दिष्टानुसार ) | २९ |
| ७ ) | समारोप | ३१ |
| ८ ) | संदर्भसूची व परिशिष्टे | ३२ |

## ❑ १. नवोपक्रमाचे शीर्षक

# ‘दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल’

....देऊ अधिकार प्रत्येक कळीस फुलण्याचा व खुलण्याचा.

# ❑ २. नवोपक्रमाची गरज व महत्व

## ▪ उपक्रम निवडण्याचे कारण :-

इयता २ री ची कक्षा ही प्राथमिक स्तरावरील सर्वात महत्वपूर्ण पायरी आहे. या स्तरावर प्रत्येक मूल प्रगत करणे सर्वात महत्वाचे असते. मुलांच्यामध्ये काही अध्ययन समस्या अथवा उणीवा दिसून आल्या तर त्यावर प्रभावी उपययोजना करून प्रभुत्व संपादन करण्यास विशेष प्रयत्न करणे अत्यावश्यक असते. याशिवाय मुलांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण अर्थात आकार याच वयोगटात साकार होत असल्याने त्याच्या सर्वांगीण विकासास पोषक वातावरण अगर संधी देणेही क्रमप्राप्त ठरत असते. खालील कारणामुळे व शैक्षणिक गरजेतून नवोपक्रम हाती घेण्याचे ठरवले.

i. या शैक्षणिक वर्षात इयता २ री चा वर्गशिक्षक या भूमिकेतून वर्गात प्रवेश घातलेल्या विद्यार्थ्यांचे जेव्हा निरीक्षण केले तेव्हा लक्षात आले की, मुलांची एकंदरीत अध्ययन पातळी समाधानकारक असली तरीही काही मुले जी कमी वयात इयत्ता १ ली साठी दाखलपात्र ठरल्याने वर्गात प्रवेश घेतला होता. अशा मुलांच्यामध्ये इयत्ता दुसरीच्या अध्ययन क्षमता विचार करता काही कच्चे दुवे असल्याचे निदर्शनात आले. या प्राथमिक अवस्थेत अध्ययनातील अडथळे दूर करून मुलांना प्रगत करणे खूप आवश्यक ठरते. वर्गातील १००% विद्यर्थ्यांना १००% प्रगत करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे विशेष उपक्रम आणि कृती कार्यक्रम घेणे आवश्यक वाटू लागले. याशिवाय शिकण्यातील आनंद घेण्यास व सृजनशीलता जोपासण्यास मुलांना प्रबलन द्यायचे होते.

ii. प्रत्येक विषयानुसार व क्षेत्रानुसार मुलांच्या विभिन्न समस्या सुरवातीच्या टप्प्यात निदर्शनात येत होत्या, सोबत प्रत्येक मुलाची प्रत्येक क्षेत्रनिहाय परिपूर्ण तयारी करून घ्यायची होती. मराठी विषय अंतर्गत 'वाचन' या मुलभूत क्षमतेच्या बाबतीत मुले इयत्ता पहिलीमध्ये वाचन करणे शिकली होती, पण काही मुलांचा वाचनाचा वेग कमी होता. काही मुले अर्थ लक्षात न घेता वाचन करत होती तर काहीजण तर आवांतर वाचनाचा कंटाळा करत होती. या समस्यांवर उपाय होतील अशी संधी एखाद्या नवोपक्रम अंतर्गत देणे आवश्यक वाटत होते. लेखनाच्या बाबतील काही सुधारणा करणे अत्यावश्यक होते. जसे सुवाच्छ व वळणदार अक्षरात लिहण्याची सवय लागणे, आपले विचार मुक्तपणे लेखनातून मांडण्याची सवय लागणे, परिसरातील तथा भोवताली अनुभवलेली निरीक्षणे आपल्या सोप्या भाषेत मांडता येणे. गणितातील नवीन संकल्पना सहजपणे आकलन होणे, गणितीय साक्षरतेमध्ये वृद्धी करणे, कूटप्रश्न सोडण्याची आवड निर्माण होणे, गणितीय दृष्टीकोन विकसित होणेही आवश्यक होते.

iii. शिक्षण विभाग, पंचायत समिती भुदरगड मार्फत इ २ री साठी घेतल्या जाणाऱ्या विशेष शालेय प्रज्ञाशोध परीक्षा करिता विशेष तयारी करून घेणे खूप गरजेचे होते.


iv. आधुनिक शिक्षण पद्ध्तीमध्ये मुलांना आय.सी.टी. साधने हाताळणे तथा त्यांचा ज्ञान मिळवण्यासाठी सुयोग्य वापर करणे; शिवाय त्यांची आवड निर्माण होणे खूप गरजेचे होते. सदर विषय करिता शाळेत आय.सी.टी. इंटिग्रेशन निर्माण होईल असे नाविन्यपूर्ण प्रयोग विशिष्ठ हेतूने करणे, विविध शैक्षणिक ॲप ची ओळख करून देणे आवश्यक वाटत होते.

v. या वयोगटात असणाऱ्या मुलांच्यामध्ये ज्ञानासोबत नवविचार करण्याची प्रवृत्ती, स्वावलंबन, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता व सुसंस्कार रुजणे खूप आवश्यक असते. या गोष्टी केवळ महत्व सांगून मुलांच्यामध्ये सहजपणे बिंबवणे शक्य नव्हते. भावनिक व सामाजिक विकासासाठी

मुलांच्या सहभागाने व पालकांच्या सहकार्याने काही विशेष कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे होते. शिवाय मुलांच्यातील सुप्त क्षमता शोधता येईल, कला गुणांना वाव देता येईल अशा जीवनकौशल्य आधारित उपक्रमांचे कालबद्ध नियोजन करणे आवश्यक होते. ७ ते ८ हा वयोगट प्राथमिक अवस्थेतील दुसरा महत्वपूर्ण अध्ययन स्तर मुलभूत क्षमता-कौशल्य व मुलाच्या सर्वांगीण विकासाच्या पायाभरणीचा कालावधी असल्याने एका आनंदी वातावरणात मुलांना मुक्त शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य देण्यासाठी सदर उपक्रम माझा वर्ग व इतर सर्वांच्यासाठीही दिशादर्शक ठरेल या विश्वासातूनच उपक्रमाची आखणी केली.

**कोराना काळात शिक्षणाची सुरवात केल्याल्या सर्व मुलांच्यामध्ये पुढील महत्वपूर्ण शैक्षणिक पर्वात पायाभूत साक्षरता, अंकगणितीय साक्षरता व 'निपुण भारत' ची उद्दिष्टे साध्य करण्यास एक पूरक कार्यक्रमाची जोड देणे आवश्यक वाटले.**

**उपक्रमाचे वेगळेपण :-** मुलांना शिकण्यात कंटाळा येऊ नये, यासाठी पारंपारिक अध्यापन पद्धतीपेक्षा नाविन्यपूर्ण असे सर्व कृती कार्यक्रम या उपक्रमांतर्गत घेतले गेले. विद्यार्थीकेंद्रित असणारा हा नवोपक्रम 'अध्यापन' ऐवजी 'अध्यानावर' भर देणारा आहे. केवळ एकाच विषयासाठी किंवा एकाच विकास क्षेत्रासाठी हा लाभदायक नसून सर्व विषय व क्षेत्रासाठी लाभदायक ठरणारा हा नवोपक्रम आहे. **केवळ विद्यार्थी-शिक्षक यांच्यातच मर्यादित आंतरक्रिया न साधता विद्यार्थी-शिक्षक-पालक-समाज असा समन्वय साधणारा हा उपक्रम आहे.**




या नवोपक्रमाचे सर्वात महत्वपूर्ण वैशिष्ट म्हणजे जोडवर्गातील मुलांच्या समावेशासह ७ ते १० वयोगट असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्यासाठी उपक्रम अंतर्गत विविध व्यवसाय कौशल्याचे पायाभूत ज्ञान देणाऱ्या ६ 'फौंडेशनल कोर्स' ची देखील सुरवात करण्यात आली. ज्यामुळे मुलांना व्यावसायिक शिक्षणाबद्दल जिज्ञासा व पायाभूत माहिती प्राप्त झाली.

- **उपक्रमाचे महत्व :-** उपक्रमातून विद्यार्थ्यात होणारे सकारात्मक वर्तन बदल खालीलप्रमाणे.
- मराठी व गणित विषयातील सर्व मुलभूत पायाभूत क्षमता प्राप्ती बरोबरच विद्यार्थी विकासाच्या सर्व क्षेत्रात परिपूर्ण तयारी साधता येते.
- मन, मेंदू, मनगट यांच्या बळकटी बरोबर मुलांचा भावनिक व सामाजिक परिपोष आपणास सुयोग्य पद्धतीने साधता येतो.
- निरीक्षणक्षमता, कारक कौशल्य, सृजनशीलता यांच्या विकासाला चालना मिळेल, याशिवाय विचारशक्तीला व नवनिर्मितीला संधी देता येते.
- परिसराचे ज्ञान, पर्यावरणातील समस्या यांची जाणीव करून देत असतानाच सामजिक जबाबदारीचे भान मुलांच्यामध्ये निर्माण करता येईल.
- मूल्यशिक्षण व राष्ट्रनिर्माण भावना वाढीस अनुकूल वातावरण साध्य होईल.

## ❑ ३. उपक्रमाची उद्दिष्टे

- वर्गातील १००% विद्यार्थ्यांनी सर्व विषयातील सर्व क्षमता प्राप्त करून प्रगत होण्यासाठी अनुरूप वातावरण निर्मिती करणे.
- बालकांना नवनिर्मितीचा विचार करण्यास प्रवृत्त करणे.
- मुलांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होईल अशी संधी निर्माण करणे.
- परिसर व मुलभूत व्यवसायिक ज्ञानातून जीवनकौशल्यांची ओळख करून देणे.
- विद्यार्थ्यांच्यामध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करुन आत्मविश्वास वाढवणे
- सुप्त क्षमतांच्या विकासास संधी देऊन सर्वांगीण विकास साधणे.
- शिकण्यातील आनंद मिळवण्याच्या प्रवृत्तीस चालना देणे.

# ❑ ४. उपक्रमाचे नियोजन

कोणत्याही कार्याचे सुयोग्य नियोजन अर्थात 'अर्धे यश' ठरत असते. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यवाही करण्यापूर्वी त्याचे कालबद्ध नियोजन करण्यात आले. नियोजनामुळे पुढील दिशा आखणे सहज सुलभ झाले, शिवाय संभाव्य समस्या व अडचणीवर यशस्वी उपाययोजना करण्यात आली. संबधित घटकांशी चर्चा करण्यात आली.

## १) पूर्वस्थितीचे निरीक्षण-

मागील शैक्षणिक सत्र अखेर मुले इयत्ता १ ली मधून २ री मध्ये प्रवेश करत असताना मुलाची अध्ययन स्तर व प्रभुत्व संपादन पातळी लक्षात घेता, मुलांची एकंदरीत स्थिती समाधानकारक होती, पण तरीही दुसरीच्या वर्गात गेलेवर मुलांची १००% प्रगत करण्याबरोबर सर्वांगीण विकासाची पायाभरणी करणे मोठे आव्हान ठरत असते. याच वर्गात असताना मुलांना शिकण्याची गोडी लागणे आवश्यक असते. मुलांना वाचन, लेखन क्षमता अवगत झाल्या असल्या तरीही मुलांना असे करण्यास कंटाळा येत असल्याचे निदर्शनात येत होते. घरी असताना मुले मोबाईलचा मनोरंजनासाठी अधिकतर वेळ घालवत असल्याच्या तक्रारी पालकांच्या कडून येऊ लागल्या होत्या. लेखनात शुद्धता तसेच प्रमाणबद्धता याचा अभाव असल्याचे जाणवत होते. परिसरातील अनेक गोष्टीबद्दल विद्यार्थी अनभिज्ञ होते. पालकांचा व्यवसाय शेती असला तरी याबाबतही मुलांना पुरेसी माहिती नव्हती. शाळेत मुलांच्यासाठी ICT LAB उभारणी केली, पण या संगणक कक्षातील उपलब्ध साधने हाताळणीचे मुलांना कौशल्य तथा ज्ञान मुलांना पुरेसे नव्हते. अनेक मुले घरी असताना घरकामात मदत करण्यास उदासीन असल्याचे निरीक्षणात आले. नवीन गोष्टी स्वतःहून शिकण्यात त्यांना फार अभिरुची नसल्याचे लक्षात येत होते. शिक्षण विभाग, पंचायत समिती भुदरगड मार्फत इ २ री साठी आयोजित केल्या जाणाऱ्या 'भुदरगड प्रज्ञाशोध परीक्षा' (BTS) शालेय स्पर्धा परीक्षा करिता मुलांची विशेष तयारी घेणे आवश्यक होते. मुलांच्या बोलण्यात आत्मविश्वासाची कमतरता जाणवत होती, ही निर्भिडता मुलांच्यात निर्माण होण्याची गरज होती. मुलांची शब्दसंपत्ती कमी असल्याचे जाणवत होते. स्वतःचा विचार, अनुभव हे लेखनातून मांडण्यात मुले असमर्थ असण्याचे जाणवत होते. मूल्यांच्यातील प्राप्त क्षमतांचे अवलोकन व परीक्षण घेण्यासाठी त्यांची पूर्वचाचणी व काही कसोट्या वापरून नोंदी जतन करण्यात आल्या. याद्वारे सुधारणात्मक उपाययोजनेसाठी नियोजनात विचार केला गेला.

**२) पालकांशी संवाद तथा अनुभवी, तज्ञाशी पूर्वचर्चा-** उपक्रमाची निश्चिती झालेवर संभाव्य गरजा, समस्या लक्षात यशस्वितेसाठी काही अनुभवी व तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेण्यात आले.

- **पर्यवेक्षीय यंत्रणा -** डायट प्राचार्य मा. डॉ. आय.सी. शेख साहेब अधिव्याख्याता मा. रमेश कोरे, मा. सरिता मोरे, मा.राणीताई पाटील, शिक्षणाधिकारी मा. आशा उबाळे, गटशिक्षणाधिकारी मा. दीपक मेंगाणे, केंद्रप्रमुख श्री. आबासाहेब पसारे यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.
- **नवोपक्रमशील शिक्षक –** अनुभवी शिक्षक श्री. सुरेश शिंगणे, श्री. संभाजी पाटील, श्री .रविकिरण चव्हाण यांचे मार्गदर्शन घेतले, याशिवाय सहकारी दिग्विजय कोटकर यांचे सहाय्य लाभले.
- **समिती, सामजिक संस्था व बलुतेदार -** शा.व्य.समिती, माता पालक संघ, महिला बचत गट, बी.डी.पाटील फौंडेशन यांचे विशेष सहकार्यलाभले. उपक्रम अंतर्गत निर्धारित फौंडेशनल कोर्सच्या कार्यवाहीसाठी कारागिरांचे, तांत्रिक लोकांची, वैदकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभदायक ठरले.

**३) आवश्यक साधनांचा विचार व उपलब्धता-** उपक्रमासाठी आवश्यक बाबींचा व साधनांचा पूर्वविचार करून त्याची यादी करण्यात आली. उपक्रम सुरु होण्यापूर्वी त्याची उपलब्धता करण्यात आली. आय.सी.टी कोर्स करिता माजी विद्यार्थी यांच्या योगदानातून ५ लाख खर्चून ग्रामीण भागातील आदर्श असे आय.सी.टी. सेंटर उभारण्यात आले. शिक्षणाधिकारी मा. एकनाथ आंबोकर साहेब यांनी तर उपक्रमासाठी स्वतःकडून टॅबलेट संचची दिली. याशिवाय उपक्रमासाठी विचारात घेतलेली इतर महत्वपूर्ण साधने खालीलप्रमाणे.

- मराठी विषयांतर्गत शब्दबाग बनवण्यासाठी कुंड्या, पेपर कार्ड्स, कोरोगेटीव्ह पेपर, वृत्तपत्र, विशेष बनवून घेतलेले रबरी शिक्के, QR कोड स्टीकर इत्यादी.
- गणित विषयक कृती कार्यक्रमासाठी मणी, गणित पेटी, स्वनिर्मित स्वाध्याय पुस्तिका, स्मार्ट बोर्ड, भौमितिक आकाराच्या घरातील विविध वस्तू.
- फौंडेशनल कोर्स करिता पाककृती साहित्य, टूल-कीट बॉक्स, प्रथमोपचार पेटी, शेतीविषयक साहित्य, शिवणकाम साहित्य, विविध बी-बियाणे व वनस्पतीची रोपे.
- काही उपयुक्त APP, ऑनलाईन टेस्ट, ई-साहित्य, संगीत साधने, रेकॉर्डिंग साधने
- उपक्रम पूर्व चाचणी ,उत्तर चाचणी (प्रश्नावली), विशेष सुलेखन वही, QR कोड सुविधायुक्त भाषण संग्रह पुस्तिका आदींची निर्मिती करण्यात आली.

**४) करावयाच्या कृतींचा निश्चित केलेला क्रम :**

1) इयत्ता पहिली मधून दुसरी मध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचा व बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकासातील उणीवांचा शोध घेणे.
2) अनुभवी नवोपक्रमशील शिक्षक, तज्ञ मार्गदर्शक व पालक यांच्याशी उपक्रम बाबत चर्चा करणे.
3) वर्गातील १००% विद्यार्थी प्रगत होण्यासाठी पूरक कृती कार्यक्रमांचे नियोजन.
4) पूर्वचाचणी आयोजित करून विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पती, भावनिक विकास व सामाजिक बुद्धिमता यांचे मूल्यमापन करणे.
5) पूर्वचाचणीवर आधारित निष्कर्ष काढले.
6) मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक कृती-कार्यक्रम व उपक्रम निश्चित करण्यात आले.
7) पालक, शाळा समिती तथा उपक्रम संबधित आवश्यक स्थानिक घटक यांच्या सहकार्याने उपक्रमाची कार्यवाही करण्यात आली.
8) उपक्रम अंतर्गत निर्धारित केलेल्या ‘फौंडेशनल कोर्स’ ची ओळख करून देऊन प्रात्यक्षिके घेण्यात आली.
9) उत्तर चाचणी आयोजित करुन त्यावर आधारित निष्कर्ष काढणे.

## ५) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

उपक्रम पूर्वस्थितीचे विद्यार्थी निरीक्षण व नोंदी ठेवल्या त्याचप्रमाणे उपक्रामोत्तर स्थितीचे निरीक्षण व नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रममुळे कोणता सकारात्मक बदल झाला ? विद्यार्थी क्षमतेत कोणते बदल दिसून आले ? कोणकोणत्या पायाभूत भाषिक क्षमता व गणितीय संबोध दृढ झाल्या ? याशिवाय अपेक्षित अध्ययन निष्पती साध्य करु शकलो का ? याचे अवलोकन केले. याबरोबरच कोणत्या उणीवा राहिल्या याचेही आत्मचिंतन केले.शिवाय उत्तर चाचणीच्या निष्कर्षातून विद्यार्थ्यांच्यामधून खालील अपेक्षित वर्तन बदल दिसून आला.

- वाचन, लेखन,भाषण, संभाषण, कला यासारख्या कौशल्यामध्ये वाढ झाली. 'सुंदर माझे अक्षर' या हस्ताक्षर प्रकल्पामुळे शास्त्रीय दृष्टीकोनातून सराव पद्धती वापरल्यामुळे मुलांचे हस्ताक्षर सुंदर व वळणदार बनले. राज्यातील अनेक शाळांनीही आपल्या शाळेत हा प्रकल्प राबिवला. अडखळत वाचणाऱ्या मुलांचे वाचन करण्याची क्षमता योग्य गतीत आल्याचे लक्षात आले.
- मुलांनी अपेक्षित गणितीय साक्षरता प्राप्त केली. विशेष बाब म्हणजे गणितामधील अवघड वाटणारे घटक मुले आवडीने व सहजपणे सोडवू लागली. सरप्राईज टेस्ट मध्ये गुण वाढले.
- मुलामध्ये नविनिर्मितीचा विचार करण्यामध्ये, सृजनशील कार्य करण्यामध्ये अभिरुची निर्माण झाली.
- शिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावीपणे करण्याचही कौशल्य, आवड विद्यार्थी व पालक यांच्यात वाढली. QR कोड चा वापर सहजतेने व सुलभतेने करण्यात विद्यार्थ्यांनी प्राविण्य संपादन केले.
- संगणक कक्षातील साहित्य, विविध शैक्षणिक ॲप हाताळण्याचे कौशल्य तथा आधुनिक तंत्रज्ञान शिकण्या अभिरुचीमध्ये वाढ झाली.
- विविध कारागीर व त्याचे व्यवसाय याबाबत प्राथमिक ज्ञान प्राप्त झाले.
- वडीलधाऱ्या व्यक्तींच्याबद्दल आदर, मित्रांना सहकार्य, परिसराचे ज्ञान, पर्यावरांची जपणूक या गोष्टीची जाणीव जागृती झाली. मुले घरच्या कामात पालकांना मदत करू लागली.
- वर्गातील १००% विद्यार्थी प्रगत झालीत.
- विद्यार्थ्यांच्यामध्ये गुणात्मक व भावात्मक विकासा सोबत सर्वांगीण विकास साध्य झाला.

## ६ ) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक )

सदर नवोपक्रम अंतर्गत नाविन्यपूर्ण आनंददायी शिक्षण पद्धतीचा प्रारंभिक अवस्थेत अवलंब करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यात आला. सदर उपक्रमाचे महत्वपूर्ण टप्पे / वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | उपक्रम अंतर्गत कृती |
|---|---|---|
| १ ) | जून २०२२ | विद्यार्थी समस्या आढावा घेणे, पालक व तज्ञांशी चर्चा करणे, उपक्रमाचे नियोजन करणे, वरिष्टांचे मार्गदर्शन घेणे, आवश्यक साधने, साहित्य व सुविधांची उपलब्धता करणे, पूर्वचाचणी घेणे, विद्यार्थी उपयुक्त 'फौंडेशनल कोर्स' अंतर्गत घ्यायची प्रात्यक्षिके निश्चिती करणे. |
| २ ) | जुलै २०२२<br>( प्रथम पक्ष ) | शब्दबाग करिता ज्ञानाची रोपटी, हस्ताक्षर सुधार प्रकल्प करिता स्मार्ट सुलेखन वही, मॅजिक कार्ड्स व स्ट्रिप्स निर्मिती, भाषण कौशल्य सुधारण्यासाठी QR कोड सुविधा सह स्मार्ट बुक प्रकाशन, आम्ही छोटे संपादक, ICT CENTER अंतर्गत प्रकल्प-प्रयोगास सुरवात, फौंडेशनल कोर्स अंतर्गत निर्धारित प्रात्यक्षिके- १ ला टप्पा सुरु करणे. |
| ३ ) | जुलै २०२२<br>( द्वितीय पक्ष) | गोष्ट गणिताची कुटप्रश्न स्वाध्याय मालिका निर्मिती, सांग तुझा रे आकार कोणता ? (घरातील वस्तूंची विशेष मुलाखत), मनोरंजनातून वर-महिने, पाढयावरती नाचू सारे, खेळ गणिताचे इत्या. कृती उपक्रम घेणे. बांधावरची शाळा-शेती क्षेत्रभेट उपक्रम, फौंडेशनल कोर्स अंतर्गत निर्धारित प्रात्यक्षिके- १ ला टप्पा पूर्ण करणे. |
| ४ ) | ऑगस्ट २०२२<br>( प्रथम पक्ष ) | टच टू ग्लोबल वर्ल्ड प्रकल्पाची वर्गात निर्मिती, टायपिंग 3D पेंटीग, इंटर अ‍ॅक्टीव्ह स्मार्ट बोर्ड हाताळणी आदी. प्रशिक्षण, गुगल लेन्स, गुगल ट्रान्सलेटर व गुगल मॅप चा प्रभावी वापर, V R BOX वापर, QR कोड बनवणे, उपयुक्त शैक्षणिक ॲपचा वापरण्याचे प्रात्यक्षिक घेणे. हम सब एक है। हा राष्ट्रभावना व सामाजिक विकास पूरक घेणे उपक्रम, माता पालक संघ व बचत गट योगदानातून शाळा परिसरात न्युट्रीशन गार्डन ची निर्मिती. फौंडेशनल कोर्स अंतर्गत निर्धारित प्रात्यक्षिके- २ रा टप्पा सुरु करणे. |
| २ ) | ऑगस्ट २०२२<br>( द्वितीय पक्ष ) | वाटेवरच्या पाट्या, शब्दशोध, माझी रोजनिशी, मेंदूशी मैत्रीचे खेळ, EVM मशीनद्वारे शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेणे, कारागीर आपल्या भेटीला, १ शाळा १०० झाडे प्रकल्पास सुरवात, आम्ही 'छोटे संपादक' व 'लिटल रिपोर्टर' कृती उपक्रम, फौंडेशनल कोर्स प्रात्याक्षिके- २ रा टप्पा पूर्ण करणे. |

| अ.क्र | कालावधी | उपक्रम अंतर्गत कृती |
|---|---|---|
| २ ) | ऑगस्ट २०२२<br>( द्वितीय पक्ष ) | वाटेवरच्या पाट्या, शब्दशोध, माझी रोजनिशी, मेंदूशी मैत्रीचे खेळ, EVM मशीनद्वारे शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेणे, कारागीर आपल्या भेटीला, १ शाळा १०० झाडे प्रकल्पास सुरवात, आम्ही 'छोटे संपादक' व 'लिटल रिपोर्टर' कृती उपक्रम, फौंडेशनल कोर्स प्रात्याक्षिके- २ रा टप्पा पूर्ण करणे. |
| ३ ) | सप्टेंबर २०२२ | सरप्राईज टेस्ट, शिक्का शाब्बासकीचा, प्लास्टिकमुक्त रविवार, वाचन सरावासाठी विविध फ्लीपबुक्सची निर्मिती, गती वाचन स्पर्धा, महिला पालकांच्या सहकार्यातून सोप्या पाककृती व शिवणकामाचे प्रात्यक्षिक वर्गात करून घेणे, फौंडेशनल कोर्स प्रात्याक्षिके -३ रा टप्पा घेणे. |
| ४ ) | ऑक्टो.२०२२ | माझे पहिले पत्र, पक्षी जगवूया- पर्यावरण वाचवूया, मै भी कलाम, मातापूजन, WE ARE LITTLE SINGER, WE ARE LITTLE DOCTER आदी कार्यक्रमांचे आयोजन. प्रथमोपचार पेटी व औषधी वनस्पती ओळख. फौंडेशनल कोर्स प्रात्याक्षिके-४ था टप्पा घेणे. |
| ५. | नोव्हें. २०२२ | परिसरातील कारखाना भेट, रांगोळी काढणे व हातावर मेहंदी काढण्याचे प्रात्यक्षिक घेणे, परसबागेतील औषधी वनस्पतीची लागवड करणे, आकाशकंदील बनवण्याचे प्रात्यक्षिक करून घेणे, हस्ताक्षर सुधार कार्यक्रमातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा गौरव करणे, उत्तर चाचणी घेणे, माहितीचे विश्लेषण करून तुलनात्मक अभ्यास करणे. फौंडेशन कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या मुलांना प्रमाणपत्र वाटप करणे. अहवाल लेखन करणे. |

## ६) उपक्रमासाठी इतरांची मदत :

शेती क्षेत्रभेटीच्या वेळी श्री. पांडुरंग पाटील यांनी खूप चांगली मदत केली. शाळेत न्युट्रीशन गार्डन निर्माण करण्यासाठी सौ. स्वाती पाटील यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. श्री. दिनानाथ सुतार या सुतारकाम करणाऱ्या व्यक्तीने एक दिवस शाळेसाठी देऊन मुलांना सुतार कामाची ओळख करून दिली. सौ. पूजा पोवार यांनी मुलानी वेळोवेळी वेळ देऊन 'शिवणकाम' कसे करावे ? याची माहिती दिली. सध्या महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या प्रतिक्षा पाटील व पूजा ढोकरे या शाळेच्या माजी विद्यार्थीनींनी शाळेतील मुलांना रांगोळी काढणे, मेहंदी काढणे, नक्षीकाम करणे आदी कामात मदत केली. शाळेच्या स्वयंपाकी रुक्मिणी झाटे यांनी पाककृतीची प्राथमिक ओळख व जेवण्याचा चांगल्या सवयी याबाबत मुलांना नियमित मार्गदर्शन केले. सदर नवोपक्रम यशस्वी राबवण्यासाठी पालक, शाळा समिती सदस्य, तसेच माजी विद्यार्थी मा. बी.डी.पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक कारागीर यांनी शाळेसाठी भेटी देऊन मुलांना मार्गदर्शन केले. कृषी पदविका पूर्ण केलेले अक्षय पाटील यांचे वेळोवेळी फौंडेशनल कोर्स करिता सहाय्य लाभले. तसेच वेळोवेळी वरिष्ठांच्या मिळालेल्या मार्गदर्शनामुळे नवोपक्रम यशस्वी ठरला.



### बशाचामोळा शाळेत डिजिटल वर्गाचे उद्घाटन

कडगाव, ता. १७ : भुदरगड तालुक्यातील बशाचामोळा प्राथमिक शाळेतील विध्यार्थ्यांकरिता ६५ हजार किमतीचे शैक्षणिक टॅब माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी दिले. बशाचामोळा येथे डॉ. बी. डी. पाटील यांनी वडिलांच्या स्मरणार्थ ४ लाख रुपये खर्चून बांधलेल्या डिजिटल इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, बिपीन ग्रुपचे अध्यक्ष बी. डी. पाटील, डॉ. अनिता आंबोकर प्रमुख उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी आंबोकर म्हणाले, की बशाचामोळा शाळेला देण्याची इच्छा होती. ग्रामीण भागातील शाळेने आनंददायी शिक्षणातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिल्याने आदर्शवत शाळा उदयास आली आहे. गटशिक्षणाधिकारी मेंगाणे म्हणाले, की प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी मदत करणं हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. ग्रामीण भागातील द्विशिक्षकी शाळेचा प्रवास सर्वांना दिशादर्शक आहे. केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, सरपंच निशा संकपाळ, मुख्याध्यापक संतोष भोसले, प्रकाश पाटील, विश्वनाथ पाटील, पूनम पाटील, संतोष पाटील, एकनाथ पाटील, बी. ए. पाटील, बी. एस. पाटील, नवनीत नाईक, अरविंद पाटील, सुवर्णा भुतल, विनायक चौगले, महादेव देसाई, शशिकांत पाटील, दत्तात्रय रेपे, जयदीप डाकरे आदी उपस्थित होते. तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांनी सुंदर गीतमंच कार्यक्रम सादर केला. मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राजू शिंदे यांनी सूत्रसंचलन केले. दिग्विजय कोटकर यांनी आभार मानले.

वडील कै. दत्तात्रय आबा पाटील यांना प्राथमिक शिक्षणाबद्दल खूप प्रेम होते. माझे प्राथमिक शिक्षण याच गावात झाले. गावातील शाळेसाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. शाळेची गरज ओळखून आय.सी.टी. केंद्र उभारल्याचे बिपीन ग्रुपचे अध्यक्ष डॉ. पाटील यांनी सांगितले.

बशाचामोळा : येथील शाळेत डिजिटल वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर डॉ. बी. डी. पाटील व अन्य मान्यवर




**सर्वात मोठी मदत-** शाळेतील मुलांच्या मध्ये तंत्रज्ञाची आवड निर्माण करणे हे एक उपक्रमातील प्रमुख उद्दिष्ट होते. यासाठी शाळेत आय.सी.टी. इंटीग्रेशन निर्माण करणे गरजेचे होते पण ह्यासाठी निधीची आवश्यकता होती. याच्या पूर्तीसाठी लोकसहभागाची हाक दिली असता सर्व ग्रामस्थांनी मदत तर केलीच पण यामध्ये शाळेचे माजी विद्यार्थी मा.डॉ.बी.डी. पाटील यांनी मोठे योगदान दिले. जवळपास ५ लाख रुपयाची आर्थिक मदत करुन ग्रामीण भागातील या शाळेत आपल्या वडिलांच्या नावे एक आदर्श असे ICT CENTER उभारून दिले. शाळेच्या कार्याची तथा राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची विशेष दखल घेत शिक्षणाधिकारी यांनीही स्वतः कडून शाळेसाठी टॅबलेट संच भेट दिलेत. यामुळे उपक्रमाची पुढील कार्यवाही करणे, विविध कृती उपक्रम घेणे अधिकच सुलभ प्रभावी झाले.

७ ) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :

नवोपक्रम अहवाल लेखन करताना कोणते पुरावे सोबत जोडावे लागतील याचा पूर्वविचार करुन प्रत्येक टप्यावर त्याची जपणूक व संग्रह करुन अहवाल लेखनासोबत जोडण्यात आलेत. नवोपक्रमाची माहिती प्रभावीपणे मांडता आली.

i. नवोपक्रम संबधित महत्वाचे फोटो. ( परिशिष्ट पान ३६ )

ii. नवोपक्रमाची संपूर्ण माहिती प्रात्यक्षिक स्वरुपात दाखवणाऱ्या व्हिडिओंची लिंक. (पान १३ )

iii. नवोपक्रम अंतर्गत कृती कार्यक्रम तथा प्रकल्प संबंधित गुगल ड्राईव्ह वर अपलोड केलेल्या डोक्युमेंट फाईल फोल्डर ची लिंक (परिशिष्ट पान क्र. ३३ )

iv. पूरक ई-साहित्याची लिंक.

v. संदर्भ म्हणून वापरलेल्या साहित्याची यादी. (परिशिष्ट पान ३२ )

vi. कृती कार्यक्रम यासाठी तयार केलेले वेळापत्रक व मासिक नियोजन यांचे नमुने (पान ८ )

vii. पूर्व चाचणी, उत्तर चाचणी याकरिता वर्तन बदल नोंद तक्ते व कसोटी नमुने. ( पान २४ )

viii. विद्यार्थी मूल्यमापन विश्लेषणात्मक तक्ते, आलेख. (पान २५ )

ix. फौंडेशनल कोर्स अंतर्गत निश्चित केलेला अभ्यासक्रम व कृती उपक्रम आराखडा. (पान २० )

x. सुलेखन अभ्यास वर्गामुळे मुलांच्या लेखन कौशल्यात सुधारणा झाल्याचे नमुने. (पान १४ )

xi. उपक्रमाचा आदर्श घेत असलेल्या शाळांची यादी, नवोपक्रमबाबत शिक्षक प्रतिक्रिया व अभिप्राय. (पान ३० )

i. नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी तयार केलेले इ-साहीत्य, स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य यांचे नमुने.

ii. नवोपक्रम अंतर्गत घेतलेल्या महत्वाच्या उपक्रमांची/ कृती कार्यक्रमांची यादी. (पान १३ ते १९ )

नवोपक्रम संबंधित सर्व व्हिडिओ संग्रह :
https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnyi_FDrMuhjyGLTulkSphYs

SCAN / CLICK

# ❑ ५. उपक्रमाची कार्यपद्धती

▪ **उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :-**

या शैक्षणिक वर्षात इयत्ता २ री चा वर्गशिक्षक म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर वर्गातील १३ विद्यार्थ्यांना १००% प्रगत करण्यासाठी तथा त्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ‘दुसरे पाऊल, आनंदी शिक्षणाची चाहूल !’ ह्या नवोपक्रमाचे नियोजन करण्यात आले. मराठी, गणित या महत्वपूर्ण विषयासह सर्व क्षेत्र विकासाचा अंतर्भाव विविध उपक्रमांच्या निश्चिती मधून करण्यात आला. पूर्वस्थितीचे निरीक्षण करत असताना खालील बाबींचे निरीक्षण शाळेत केले. याशिवाय गृह्भेटीच्या वेळीही पालकांना माहिती विचारून त्याच्या त्याच्या नोंदी ठेवण्यात आल्या.

- वर्गात न अडखळता वाचणारी एकूण मुले किती आहेत ?
- श्रुतलेखनात चुका करणारी मुलांची संख्या किती ?
- चित्राचे वर्णन योग्य शब्दात करणारी मुलांची संख्या.
- बेरीज, वजाबाकी या मुलभूत क्रिया अचूकपणे सोडवणारी व चुकणारी मुले.
- शाब्दिक उदाहरणे सोडवताना गोंधळणारी मुले.
- इंग्रजी मधील सर्व अल्फाबेट वाचन व श्रुतलेखन करणारी मुले.
- एकमेकांशी नेहमी भांडण करणारी मुले किती आहेत ?
- घरी असताना मोबाईलचा अतिवापर गेम खेळण्यासाठी करणाऱ्या मुलांची संख्या.
- पाल्यांच्या अभ्यासाविषयी विचारपूस करणाऱ्या तसेच स्वाध्याय सोडवण्यास पाल्यांना मदत करणाऱ्या पालकांची संख्या.
- बालवाचनालयातील पुस्तके वाचनासाठी घेणाऱ्या मुलांची संख्या.
- आपल्या परिसरात असणाऱ्या पिकांची नावे माहिती असलेले विद्यार्थी.
- घरातील व्यक्तींच्याबरोबर उद्धटपणे वागणारी किंवा तशी तक्रार आलेली मुले किती आहेत ?
- एकाग्रता नसलेली मुले किती आहेत ?
- बोलताना भीती बाळगणारी किंवा आत्मविश्वास कमी असलेली मुले किती आहेत ?

**वरील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करून अपेक्षित वर्तन बदल सध्य करण्यासाठी त्याअनुषंगाने कृती उपक्रमांची निश्चिती व कार्यवाही करण्यात आली.**

सदर उपक्रम प्रथम शैक्षणिक सत्रात राबविला जाणार होता. या उपक्रमात गुणात्मक विकासाबरोबरच भावात्मक विकासावर भर दिला जाणार होता. पाठ्यक्रम समावेशित अध्ययन निष्पती प्रमाणे जीवनकौशल्य विकासाचा सर्वसमावेशक विचार केला गेला होता. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाताना शिवाय बेरोजगारी सारख्या भविष्यकालीन समस्या निराकरणाची पूर्वतयारी बालवयातच व्हावी यासाठी काही काही विशेष फौंडेशनल कोर्स (पायाभूत ज्ञान) अभ्यासक्रम निश्चित करून त्यांना ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे अथवा तसा भविष्याचा विचार आतापासूनच करण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी प्रबलन व मार्गदर्शन करण्याचे योजले. मुलांचा कल, आवड लक्षात घेण्यासाठी विशेष प्रश्नावली तथा कसोट्या वापरण्यात आल्या. उदा. तुला भविष्यात कोण व्हायचे आहे ? कोणते काम करायला अधिक आवडते ? या आधारित प्रश्नावली देणे. विविध व्यवसायकांची चित्रे देऊन त्यातील आवडणाऱ्या एकाच व्यावसायिकाचे चित्र रंगवण्यास सांगणे. यावरून मुलाची आवड समजली. या आधारावर पायाभूत ओळख करुन देणाऱ्या ६ कोर्सची रचना करण्यात आली.

नवोपक्रमाच्या कार्यवाहीमध्ये खालील कृती-कार्यक्रम तथा प्रकल्पांचा समावेश करण्यात आला.

**कृती क्र.१. शब्द बाग** ( विकास क्षेत्र : भाषा समृद्धी )

मुलांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ व्हावी. वाचन क्षमतेत वाढ व्हावी यासाठी हा प्रकल्प सुरु करण्यात आला. रोपवाटिकामधील सुकलेल्या झाडांचा कल्पकतेने व मुलांच्या सहभागातून असा प्रयोग करण्यात आला. ज्ञानाची रोपटी बनवून शाळेत अशी अनोखी व सुंदर अशी शब्दांची बाग तयार करण्यात आली.

**अध्ययन निष्पती- 02.01.11** लिखित / छापलेल्या मजकुरातील अक्षर, शब्द आणि वाक्य असा प्रत्येक संबोध स्पष्ट ओळखतात.



**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/XK61ULMYEFw

**कृती क्र.२. गमतीने शिकू वार आणि महिने** ( विकास क्षेत्र : गणित-कालमापन)

वार व महिने या महत्वपूर्ण घटकांची रंजक पद्धतीने ओळख व सराव घेण्यासाठी नाविन्यपूर्ण खेळ घेण्यात आलेत. यामध्ये सर्व मुलांनी आवडीने भाग घेऊन सहजपणे मराठी व इंग्रजीमधील वार व महिने यांची माहिती ज्ञात केली.

**अध्ययन निष्पती- 02.71.08** आठवड्यातील वारांची नावे, वर्षातील महिन्यांची नावे ओळखतात.




**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/GlDD79bX_bg

**कृती क्र.३. मॅजिक कार्ड्स वापर** ( विकास क्षेत्र : भाषा - मराठी व इंगजी शब्दसंपत्ती)

मराठी व इंग्रजीमधील विशिष्ट अक्षराने सुरु होणाऱ्या शब्दांचे लेखन फळ्यावर अथवा फरशीवर करून त्या अक्षराचे कार्ड प्रत्येक समूहाच्या सुरुवातीला जोडून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाचे वाचन करुन त्याच्या नोंदी वहीत करण्यास सांगणे.

**अध्ययन निष्पती- 02.01.12** वर्णमालेतील अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखतात.


**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/FpsMsPFShyU


**कृती क्र.४. 'सुंदर माझे अक्षर' हस्ताक्षर सुधार प्रकल्प** ( विकास क्षेत्र : भाषा- लेखन क्षमता )

सर्व मुलांनी सुवाच्छ, वळणदार अक्षरात लिहावे यासाठी ३० दिवस चालणार हा सुलेखन अभ्यासवर्ग घेण्यात आला. यासाठी अक्षरांच्या आकारानुसार विशिष्ट गट बनवून त्या गटातील अक्षराचा समावेश असणारे शब्दसमूह व उतारे लेखन करण्यात आले. **सुलेखन कसे असावे ? याचा आदर्श नमुना मुलांना समजण्यासाठी स्वअक्षरात अशी सुलेखन वही तयार करून ती सर्व मुलांना सरावासाठी देण्यासाठी त्याची सॉफ्ट कॉपी बनवण्यातील आली.** त्याच्या डाव्या बाजूला शिक्षक लिखित नमुना व उजव्या बाजूला विद्यार्थी लेखनासाठी जागा देण्यात आली. सदर प्रिंटच्या वापरामुळे मुलांना सहजपणे सुलेखनाचा आदर्श व सराव मिळाला त्याचा आज राज्यभरही वापर केला जात आहे.

**<u>अध्ययन निष्पती</u>- 02.01.14** स्वत : अथवा शिक्षकांनी ठरवलेल्या उपक्रमांतर्गत चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर-आकृती यांच्या पुढे जाऊन स्वयंपद्धतीने लेखन व स्व-नियंत्रित लेखन करतात.

**स्मार्ट सुलेखन वही मधील एक नमुना** | **विद्यार्थी सुलेखन नमुना**




## निवडक अभिप्राय व प्रतिक्रिया










**हस्ताक्षर सुधार प्रकल्पातील सर्व सुलेखन नमुने व पुरावे संग्रह** (गुगल ड्राईव्ह) लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1itFL1ODYb3j0IR_mSceLw7GgbbMN4-mP?usp=share_link

**कृती क्र.५. 'आम्ही छोटे वार्ताहर व संपादक' Virtual News Room Studio**

( विकास क्षेत्र : भाषा व सामान्यज्ञान )

या कार्यक्रमांतर्गत परिसरात घडणाऱ्या विविध घटनांच्या नोंदी घेण्याची जबाबदारी मुलांना देण्यात आली. ह्या मुलांनी संकलित केलेल्या बातम्याचे एक साप्ताहिक प्रकाशित करण्याची पद्धत सुरु करण्यात आली. यासाठी आवश्यक ते घटना बाबत फोटो मुलांना पुरवण्यात आलेत. शाळेतील विविध घडामोडींचे संकलन करून सोप्या छोट्या बातम्या तयार करण्याची जबाबदारी मुलांना देण्यात आली. यासाठी वृतपत्रे व साप्ताहिक नमुने दाखवण्यात आलेत. शाळेमध्ये **Virtual News Room Studio** निर्माण करण्याचा पहिला अभिनव प्रयोग करण्यात आला. दैनिक घडामोडींचे मुलांच्याकडून निवेदन करून घेऊन ते व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारा प्रसारित करण्यात आलेत.

**<u>अध्ययन निष्पती</u>- 02.01.04** आपल्या आसपास घडणाऱ्या व ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टींचा (उदा.कथा, कविता , पोस्टर्स , जाहिरात) संबंध जोडून त्याबाबत गप्पा गोष्टी करतात.

लिंक : https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU




**<u>सध्य उद्दिष्ट -</u> ५. विद्यार्थ्याच्यामध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करुन आत्मविश्वास वाढवणे.**

**कृती क्र.६. ऑनलाईन सरप्राईज टेस्ट सोडवणे** ( विकास क्षेत्र : गणितीय घटक )

गणित विषयातील अवघड वाटणाऱ्या घटकासह सर्व गणितीय घटकांची परिपूर्ण तयारी होऊन शिक्षण विभागामार्फत इ २ री साठी घेतल्या जाणाऱ्या शालेय स्पर्धा परीक्षा (BTS) तयारी करिता गुगल फॉर्मच्या आधारे ५० गुणांच्या वैशिष्टपूर्ण टेस्ट बनवण्यात आल्या. टॅबलेटच्या आधारे मुलांच्याकडून सोडवून घेण्यात आल्या. सदर टेस्ट कधी होणार ? याची पूर्वसूचना मुलांना दिली जात नसायची. वर्गात अचानकपणे मुलांच्या गणितीय ज्ञानाचे मूल्यमापन करण्यास ही मालिका उपयुक्त ठरली. या उपक्रमाचा व टेस्टचा लाभ राज्यातील हजारो मुलांनी घेतला. सरावातून गणित विषयावर प्रभुत्व संपादन झाले.

**अध्ययन निष्पती- 02.71.09** मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करून अनुमान काढतात.

**यामधील काही टेस्ट नमुने व प्रतिसादाचा गोषवारा**



| दिनांक | ऑनलाईन टेस्ट क्रमांक | टेस्ट लिक | रिझल्ट शीट लिंक (राज्यस्तर) | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १६/९/२०२२ | सरप्राईज टेस्ट १ | https://forms.gle/mYg8Zv4eq9f3Vna58 | shorturl.at/bkOR3 | **१३५७** |
| २२/९/२०२२ | सरप्राईज टेस्ट २ | https://forms.gle/DM7UvbKHpeM3D1zv8 | shorturl.at/nX149 | **१४६७** |
| ३०/९/२०२२ | सरप्राईज टेस्ट 3 | https://forms.gle/PD6CqJTAbGfXuB4d7 | shorturl.at/QX017 | **१४५०** |

**कृती क्र.७. घरातील वस्तूंची मुलाखत** ( विकास क्षेत्र : गणित- भौमितिक आकार )

मुलांना विविध भौमितिक आकारांची परिपूर्ण ओळख व्हावी यासाठी घरातील वस्तूंची विशेष मुलाखत घेण्याचे काम देण्यात आले. यामध्ये प्रत्येक वस्तूला "साग ! तुझा रे, कोणता आकार आहे ?" असा प्रश्न विचारून त्याने काय उत्तर दिले असेल याची कल्पना करून प्रश्न उत्तरे लिहायची. या कृतीतून मुलांनी प्रत्यक्ष साहित्य हाताळून त्याच्या आकाराची योगय नोंदी घेतल्या. (गुगल ड्राईव्ह) लिंक : shorturl.at/NSUZ4

**कृती क्र.८. गणिताच्या गोष्टी** ( विकास क्षेत्र : गणित व बुद्धिमता)

'गोष्टी' हा प्रकार केवळ आपण भाषा विषयात पहिल्या आहेत. गणित या विषयात देखील काही कूटप्रश्नावर आधारित गोष्टी तयार करण्याचा नाविन्यपूर्ण प्रयत्न करण्यात आला. गणित सारखा कठीण वाटणाऱ्या विषयातील संकल्पना, घटक हे पाठांतर किंवा पारंपारिक पद्धतीने समजवण्यापेक्षा वेगळ्या स्वाध्याय पद्धतीने दृढ करता येतात. गणिताचा व्यावहारिक व उपयोजनात्मक वापर करता यावा यासाठी गणितीय घटकावर काही गोष्टी तयार केल्या. ज्यातील समस्यांची उकल करता करता तो घटक खोलवर समजेल शिवाय गणिताची गोडी वाढेल. गणित शिकण्यातील आनंद वाढेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गणित विषय सोबत भाषिक विकास सुद्धा होणार आहे.

अध्ययन निष्पती- **02.71.09** मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करून अनुमान काढतात.

गुगल ड्राईव्ह लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1l8_1sBud0WnsULTUjQFox492xgqTagrA?usp

**😊😊 गोष्ट गणिताची क्र. १ 😊😊**

(**घटक** : भौमितिक आकार - शंकू, इष्टिकाचिती, दंडगोल व गोल )

सूचना : खाली वर्गात घडलेली गोष्ट दिली आहे ती समजपूर्वक वाचा व चौकोतीत योग्य संख्या भरा व रिक्त जागी योग्य शब्द भरुन पूर्ण करा.

गुरुजी वर्गात आले आणि काही साहित्य मुलांना हाताळण्यस दिले. थोड्या वेळाने गुरुजी म्हणाले, " मी आता काही प्रश्न विचारणार आहे, सांगा कोण तयार आहे उत्तर द्यायला ? " सुरज पुढे आला. गुरुजींनी त्याच्या हातात डस्टर देत विचारेले, " सुरज या डस्टरचा आकार कोणता आहे रे ? " यावर सुरज म्हणाला , '........................' पुढे गुरुजी म्हणाले, " कडा किती आहेत ? मोज पाहू " सुरज पटपट सर्व कडा मोजू लागला व त्याने ☐ कडा असलाचे गुरुजींनी सांगितले. मग गुरुजी म्हणाले , "तुझ्या हाताला किती कोपरे लागतात याचे उत्तर सांगशील ? " सुरज पटकन म्हणाला," ☐ कोपरे आहेत गुरुजी. गुरुजींनी आता शेवटचा प्रश्न विचारला, " याला एकूण पृष्टे किती आहेत ?" तो म्हणाला, ☐ गुरुजींनी अभिनंदन केले. सुरज जागेवर गेला. आता मिनीक्षा पुढे आली. गुरुजींनी तिच्या डोक्यावर '....................' आकाराची जोकर सारखी टोपी डोक्यावर ठेवली. गुरुजी म्हणाले, " मिनीक्षा, सांग या टोपीला किती कडा व किती कोपरे आहेत ? मिनीक्षा लागलीच म्हणाली, " या टोपीला ☐ कडा व ☐ कोपरे आहेत. गुरुजी खश झाले, त्यांनी मिनीक्षाला टोपी बक्षीस दिली. तिसऱ्या क्रमांकाला अक्षयला पुढे बोलवण्यात आले, सोबत पाण्याची बॉटल ही घेऊन येण्यास सांगितले. वक्रपृष्टभाग व सपाट तळ असणारी ती बॉटल घेऊन तो पुढे आला त्याने निरीक्षण केले तर त्याला ☐ कडा असलयाचे दिसले, पण कोपरे मात्र

☐ होते. गुरुजींनी विचारले , " या बॉटलच्या आकारास काय म्हणतात माहिती आहे ? " होय ! म्हणत त्याने सांगितले की, " याला ...................... किंवा ........................ असेही म्हणतात . सर्वात शेवटी, फातिमाला बोलवण्यास आले. गुरुजींनी तिच्या हातात चेंडू फेकला फातिमाने ............... आकाराचा चेंडू अलगत झेलला. गुरुजींनी काही विचारायच्या आधीच फातिमा म्हणाली, "गुरुजी याला तर ..........ही कोपरा नाही की, .........ही कडा नाही याला कडा व कोपरे दोन्ही आहेत. सर्वांनी छान प्रतिसाद दिला होता. सर्वांचे अभिनंदन केले मुले आता वर्गातील इतर वस्तू हाताळू लागली, त्याचा आकार कोणता असेल ? याचा विचार करू लागली.

**😊😊 गोष्ट गणिताची क्र. ३ 😊😊**

( घटक : **दशक, एकक समजून घेऊ** )

**सूचना : खाली सुनंदाची गोष्ट दिली आहे ती समजपूर्वक वाचा व चौकोतीत योग्य संख्या भरा.**

सुनंदा अंगणात खेळत होती, इतक्यात तिची आई फुलांची टोपली घेऊन आली. त्या टोपलीत ४५ झेंडूची फुले होती. आई म्हणाली, " हे बघ सुनंदा ! तुला १० फुलांची एक माळ अशा माळा बनवायच्या आहेत... लवकर बनवं ! बाजारात विकायलाही जायचे आहे, आधीच खूप उशीर झालाय ! " सुनंदाने माळा बनवायला सुरवात केली. एका माळेसाठी ☐ दशक फुले लागणार होती. त्या ४५ फुलांपासून प्रत्येकी १० प्रमाणे ☐ माळा तयार झाल्या व ☐ सुट्टी फुले शिल्लक राहीली. आता या राहिलेल्या सुट्ट्या फुलात १० ची एक माळ बनत नव्हती. १० फुले घेण्यासाठी यात आणखी ☐ फुले कमी पडत होती; म्हणून सुनंदा पळत बागेत गेली. पटपट कमी पडणारी ☐ फुले तोडून आणली. आता सुनंदा जवळ १० फुले झाली होती, म्हणजेच एकूण ☐ दशक फुले शिल्लक होती. यापासून तिने शेवटची आणखी एक माळ बनवायला हाती घेतली व तिची पाचवी माळ ही तयार झाली. या सर्व माळांसाठी आईने दिलेली ☐ फुले व सुनंदाने बागेतून आणलेली ☐ फुले अशी एकूण ☐ फुले लागली.

थोड्या वेळातच सुनंदाची आई तिथे आली व सुनंदाला घेऊन बाजारात गेली सोबत विकण्यासाठी भाजीपाला व फुलांच्या माळाही घेतल्या. आई भाजीपाला विकत होती तर सुनंदा तिने स्वतः बनवलेलया फुलांच्या माळा विकत होती. एका माळेसाठी ७ रुपये दर लावला होता. पहिले गिऱ्हाईक आले. त्याने एकच माळ विकत घेतली व खिशातून १० रुपयाची एक नोट सुनंदाच्या हातावर ठेवली. सुनंदाने त्यातील ७ रुपये एका माळचे घेतले व ☐ रुपये परत केले. इतक्यात घाईघाईने शेजारच्या शोभा काकू आल्या व म्हंटल्या, " अग सुनंदे ! किती ताजी फुले आहेत ग ! किती माळा शिल्लक आहेत ? " यावर सुनंदाने चार माळा शिल्लक असल्याचे सांगितले. शोभा काकूंनी सर्व माळा विकत घेतल्या. " काकू तुमचे चार माळांचे एकूण ☐ रुपये झाले बघा " सुनंदा म्हणाली. काकूंच्याकडे सुट्टे पैसे नव्हते. काकूंनी सरळ पन्नासची नोट सुनंदाच्या हातावर ठेवली. सुनंदाला आता २२ रुपये परत द्यावे लागणार होते, म्हणून तिने १० रुपयाच्या ☐ नोटा व १ रुपयाची ☐ नाणी काकूंना परत दिली. सुनंदाला आज खूप आनंद झाला होता; कारण तिने बनवलेलया सर्व माळा आज काही वेळातच विकल्या गेलया होत्या. पुढील वेळेस तिने अशाच १० माळा बनवण्याचे ठरवले पण त्यासाठी एक शतक म्हणजेच ☐ फुले लागणार होती. सुनंदाच्या फुलांच्या सर्व माळा विकल्या गेल्या होत्या पण हातातून फुलांचा सुगंध मात्र अजूनही दरवळत होता.

**कृती क्र.९ . LETS PLAY WITH ICT TOYES** ( विकास क्षेत्र : विज्ञान व तंत्रज्ञान)

मुलांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी तसेच साधने योग्य प्रकारे हाताळता यावीत यासाठी हा विशेष प्रकल्प ICT CENTER च्या माध्यामतून घेण्यात आला. या अंतर्गत Read Alonge , Ps school, Google Map, Google Lense, Piyano, Solar system 3D या सारख्या ॲपची व Alexa Divice, V-R Box, Recording Materials आदी. बाबींची ओळख करून देऊन सराव घेण्यात आला. **अध्ययन निष्पती : 02.17.03** Expresses verbally her or his opinion and asks questions about the characters, storyline etc. in English or in home language.

व्हिडिओ संग्रह लिंक:

:https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnydgdoVsV3vkkDL0VdDnOsi

**कृती क्र.१०. हम सब एक है** ( विकास क्षेत्र : सामाजिक बुद्धिमता व राष्ट्रभावना )

मूल्यशिक्षण देण्यासाठी तथा राष्ट्रीय एकात्मता देण्यासाठी या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या मध्ये विद्यार्थ्यांना सर्व धर्मियांच्या प्रार्थना स्थळांना भेट घडवून आणण्यात आली. प्रत्येक धर्माचे धर्म संस्कार तथा रितीरिवाज मुलांनी जाणून घेतले.

**अपेक्षित वर्तन बदल-** परधर्मातील माहिती जाणून घेणे. इतर धर्मीयांबद्दल स्नेह आदरभाव बाळगणे.

**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/P-KLlOyFJLE



**कृती क्र.११. शाळा भरली बांधावर- क्षेत्र भेट** ( विकास क्षेत्र : परिसर अभ्यास-शेती ज्ञान )

स्थानिक लोकांचा व पालकांचा बहुतांश व्यवसाय हा शेती असल्यामुळे शेतीबद्दल तोंडी माहिती देण्यापेक्षा प्रत्यक्ष शेतात भेट देऊन शेतीची, पिकांची, साधनांची व शेतीतील कामांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली.

**अपेक्षित वर्तन बदल-** स्थानिक ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या पिकाविषयी माहिती असणे, कोणती पिके कोणत्या ऋतूत घेतात या विषयी माहिती असणे, शेतीसाठी लागणाऱ्या साधनांची माहिती असणे.

**व्हिडिओ लिंक** : https://youtu.be/VgyKfiPWdUA



**कृती क्र.१२. माता पूजन** ( विकास क्षेत्र : मूल्यशिक्षण )

आपल्या आई वडिलांच्याबद्दल मुलांच्यात आदरभाव निर्माण व्हावा यासाठी शाळेत एक दिवस माता पूजन कार्यक्रम घेतला जातो. या दिवशी मुले आपल्या मातांचे पाद्यपूजन करून कृतज्ञता व्यक्त करतात

**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/XzgUspj4CxY

**कृती क्र.१३.** टच टू ग्लोबल वर्ल्ड ( विकास क्षेत्र : तंत्रज्ञान व सामान्यज्ञान)

या प्रकल्प अंतर्गत मुलांना अध्यानास उपयुक्त ठरतील अशा वेबसाईट लिंक चे QR कोड स्टीकर बनवून ते प्रत्येक मुलांच्या बेंचवर चिकटवण्यात आलेत त्यामुळे टॅबलेट मधून स्कॅन करताच अगदी सहजपणे अशी विद्यार्थी उपयुक्त शैक्षणिक स्थळांना मुलांनाही सहजपणे भेट देता येऊ लागले. यामुळे या लहान मुलांनाही PSCHOOL वरील ऑनलाईन एक्टीव्हीटी सोडवणे, गुगल ट्रान्सलेटर द्वारे अर्थ शोधणे, ऑनलाईन स्टोरी ऐकणे, पाठ्यक्रमावरील ई-कंटेंट पाहणे, गुगल वर विशिष्ट गोष्टीबद्दल माहिती शोधणे या गोष्टी मुले आवडीने करू लागली.

**अपेक्षित वर्तन बदल-** QR कोड स्कॅन करुन ऑनलाईन स्थळांना भेटी देऊन सहजपणे आवश्यक माहिती शोधता येणे.

विहिडओ लिंक : https://youtu.be/MWIXH298L9A



**कृती क्र.१४. प्लास्टिकमुक्त रविवार, सुंदर करू आपला आवार** ( विकास क्षेत्र : पर्यावरण, आरोग्य )

रविवार या सुट्टीच्या दिवशी मुले आपल्या परिसरातील प्लास्टिकचा कचरा गोळा करतात. प्लास्टिक वस्तू न वापरण्याबाबत शपथ घेऊन गावामध्ये जागृती देखील करतात.

**अपेक्षित वर्तन बदल-** पर्यावरण संवर्धनाची जाणीव होऊन प्लास्टिक वापर टाळणे.

विहिडओ लिंक : https://youtu.be/ZSJwrr3giT4

**कृती क्र.१५. वर्गातील वाढदिवस , आनंदाचा दिवस** ( विकास क्षेत्र : भावनिक व सामाजिक)

वर्गातील मुलांचा वाढदिवस वर्गातच साजरा करण्याची पद्धत सुरु करण्यात आली पण हा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात येतो. मुले केक कापण्याऐवजी फळे कापून आपला वाढदिवस साजरा करतात. मुलाला एक झाड दत्तक दिले जाते. या दिवशी आपल्या सर्व मित्रांना उपयुक्त होईल अशी भेटवस्तू देतात. यामुळे मुलांना वही, पेन, पेन्सिल, पट्टी, वाचनाची पुस्तके या सर्व गरजेच्या वस्तूंची पूर्तता झाली. **काही मुलांनी तर टूथपेस्ट, ब्रश यासारख्या वस्तूंचीही भेट दिली. अशा प्रकारे या परंपरेतून आरोग्यपूर्ण सवयी देखील मुलांना लागल्या.**

**अपेक्षित वर्तन बदल-** आपल्या सोबतच्या व्यक्तीबरोबर स्नेहभावाने वागणे, सहकार्य करुन आपल्या सहकाऱ्यांची गरज पूर्ण करणे.

ड्राईव्ह लिंक : https://drive.google.com/drive/folders/1m7Z1_SkYFGLT9W7rNZYT204E-Q4hehMw?usp=share_link

**कृती क्र.१६. एक दिवस शाळेसाठी** ( विकास क्षेत्र :जीवन कौशल्य, कला, कार्यानुभव )

नवोपक्रम अंतर्गत निर्धारित केलेल्या फौंडेशनल कोर्स मधील प्रात्यक्षिक कार्य करून घेण्यासाठी तसेच मार्गदर्शन करण्यासाठी स्थानिक कारागीर यांची साह्ययत्ता घेतली जाते. एक दिवस शाळा भेटी चे निमंत्रण देऊन व्यावसायिक कामांची तथा त्यासाठी लागणाऱ्या साधनांची माहिती प्रत्यक्ष शाळेत मुलांना दिली गेली. सुतारकाम, परीटकाम, पेंटिंग असे कलाकुसरीचे काम कारगीरानी तर शिवणकाम, नक्षीकाम तसेच सोप्या पाककृती माता पालकांनी येऊन शिकवल्या. याशिवाय वैदकीय अधिकारी यांनी देखील प्रथमोपचार व औषधी वनस्पती याबबत मार्गदर्शन केले.

**<u>अपेक्षित वर्तन बदल</u>-** परिसरात केल्या जाणाऱ्या व्यवसायाबद्दल माहिती सांगता येणे. विशिष्ठ कामासाठी कोणते साहित्य आवश्यक असते याची माहिती असणे.

**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/_ttmNhi0zRo




**( शिवणकाम , पाककृती व सुतारकाम या कामाची ओळख करून देताना ग्रामस्थ व कारागीर )**

**कृती क्र.१७. बचत गटाच्या योगादांतून न्युट्रीशन गार्डन निर्मिती** ( विकास क्षेत्र : कार्यानुव, आरोग्य)

गावातील बचत गटाच्या माध्यमातून शाळेच्या आवारात न्युट्रीशन गार्डन निर्मिती करण्यात आली. त्यामुळे मुलांना या कामाची प्रत्यक्ष पाहणी करता आली. शिवाय मुलांना सकस व आरोग्यपूर्ण आहार मिळाला. समाज व शाळा यांच्यातील समन्वय देखील यातून वाढला.

**<u>अपेक्षित वर्तन बदल</u>-** लागवड करता येतील अशा पालेभाज्या व फळभाज्या यांची पुरेसी माहिती असणे.

**व्हिडिओ लिंक :** https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnwmcj_f-



| उपक्रम अंतर्गत निश्चित केलेला फौंडेशन कोर्स अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक कार्य

| .क्र | उपक्रम अंतर्गत कोर्स | सुनिश्चित केलेल्या कृती आणि उपक्रम |
|---|---|---|
| १. | **फौंडेशनल कोर्स ऑफ आय.सी.टी** | टायपिंग, एम एस ऑफिस ओळख, पेंट टूल्स तथा 3D पेंटिंग, संगणक जोडणी, प्रोजेक्टर कानेक्टीविटी, प्रिंट्स काढणे, इंटर अक्टीव स्मार्ट बोर्ड हाताळणे, फोटोशॉपी, व्हिडिओएडिटिंग, गुगल मॅप चा वापर करणे, विविध उपयुक्त ॲप चा प्रभावी वापर करणे, QR कोड बनवणे इत्यादी. |
| २. | **फौंडेशनल कोर्स ऑफ इलेक्ट्रिक** | टूल कीट बॉक्स साहित्य ओळख, साहित्याचा प्रत्यक्षिक वापर, बल्ब ची जोडणी, रोबोटिक्स ची प्राथमिक ओळख, वायर ची जोडणी, प्लग पिन- होल्डर फिटिंग, विद्युत सुरक्षितता याची माहिती, बॅटरी सेल चा वापर करून छोटी उपकरणे व यांत्रिक मोडेल्स बनवणे. |
| ३. | **फौंडेशनल कोर्स ऑफ सायन्स & आयुर्वेद** | औषधी वनस्पतीची ओळख व वापर, प्रथमोपचार पद्धती, सुयोग्य आहार ओळख, आरोग्यपूर्ण सवयी, शुद्ध पाणी जागरुकता, वैद्यकीय अधिकारी शिबीर, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता नियमावली, स्टेथस्कोप- वजनकाटा-सुगर टेस्ट यासारख्या साधनांची प्रत्यक्ष ओळख, सुश्रुषा अनुभूती. |
| ४. | **फौंडेशनल कोर्स ऑफ कुकिंग** | जेवणासाठी लागणाऱ्या साधनांची ओळख, जेवणासाठी लागणाऱ्या पदार्थांची ओळख, महिला बचत गत शिबीर सहभाग, चहा बनवणे-सरबत बनवणे-भात बनवणे- भाकरी बनवणे- भाजी बनवणे-नाश्ता पदार्थ बनवणे यासारख्या सोप्या पाकशास्त्र कृतींचे आयोजन, शालेय पोषण साठी न्युट्रीशन गार्डन तयार करणे. |
| ५. | **फौंडेशनल कोर्स ऑफ अग्रीकल्चरल** | गुगल लेन्स चा वापर करून वनस्पतींचा अभ्यास करणे, परिसरातील शेती व झाडांचा अभ्यास करणे, प्रत्यक्ष शेती क्षेत्रास भेट देणे, शेतकऱ्यांच्या मुलाखती तसेच शेती साधनांची ओळख, आधुनिक शेती पद्धतीची प्राथमिक ओळख, शेतीसाठी नवीन यंत्राची ओळख, शेती सोबत करून देता येतील असे पशुपालन ओळख, धान्याची काळजी साठवणूक याबाबत माहिती, फळांची व फुलांचे वैशिष्टे याबाबत मार्गदर्शन, जैविक खत निर्मिती तथा बायो प्रकल्प ओळख. |
| ६. | **फौंडेशनल कोर्स ऑफ आर्ट** | हस्तकला प्रशिक्षण, न्यूज रिपोर्टिंग प्रशिक्षण, कराओके सिंगिंग, बोलक्या बाहुल्या, चित्रकला, नृत्य-नाट्य-अभिनय यासाठी विशेष उपक्रम, क्रोमा इफेक्ट वापर, कापडावरील नक्षीकाम-वारली चित्रकला- आदींची ओळख, व्यक्तिमत्व विकासाचे वैविध्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करणे. |

# फौंडेशन कोर्स अभ्यासक्रम राबवण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्याकडून 60 हजार रुपयांची शरद पवार इन्स्पायर फेलोशिप बहाल




## सचिन देसाई यांची 'शरद पवार इन्स्पायर'साठी निवड

वार्ताहर
पाटगाव



विद्या मंदिर बशाचामोळा (ता. भुदरगड ) येथील उपक्रमशील शिक्षक सचिन कुंडलिक देसाई यांची "शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन करिता निवड झाली. हा फेलोशिप प्रदान सोहळा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे खासदार शरद पवार, खासदार सुप्रियाताई सुळे, डॉ. सी.डी. मायी, वसंत काळपांडे यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या वतीने १२ डिसेंबर २०२१ पासून शरद पवार इन्स्पायर फेलोशिप" सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत कृषी, साहित्य आणि शिक्षण या तीन विभागात शरद पवार इन्स्पायर फेलोशिप देण्यात येते. आपल्या कार्यक्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यासाठी ६० हजार रुपयांची आर्थिक सहाय्यता केली जाते. शिक्षण क्षेत्रासाठी राज्यातून प्राथमिक व माध्यमिक असे मिळून ४० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातून एकमेव सचिन देसाई यांनी सादर केलेल्या फाऊंडेशनल कोर्सेस फॉर लिटल मास्टर्स" या उपक्रमासाठी त्यांना सदर फेलोशिप बहाल करणेत आली.

सचिन देसाई यांची फेलोशिपसाठी निवड झालेबद्दल शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, आशा उबाळे गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, संजय कुकडे यांनी अभिनंदन केले .

## बशाचामोळा वि.मं.चे. शिक्षक सचिन देसाई यांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्रदान

**गारगोटी/महान कार्य वृत्तसेवा :**



शिक्षण, साहित्य आणि कृषी क्षेत्रामधील गुणवंतांना भविष्यकाळातील नेतृत्वासाठी प्रेरित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या नावे 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप' दिली जाते. यामध्ये मूळचे मिणचे खुर्द (ता. भुदरगड) येथील रहिवासी असणारे व सध्या विद्या मंदिर बशाचामोळा (ता. भुदरगड) येथे कार्यरत असणारे उपक्रमशील शिक्षक सचिन कुंडलिक देसाई यांची शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन करिता कोल्हापूर जिल्ह्यातून प्राथमिक विभागातून एकमेव निवड झाल्याने भुदरगड प्राथमिक शिक्षणाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यानिमित्ताने तालुक्यातील प्राथमिक शिक्षण व शिक्षकांची सर्वांगीण गुणवत्ता अधोरेखित झाली असून जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात भुदरगडचा दबदबा निर्माण झाला आहे. हा फेलोशिप प्रदान सोहळा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे खासदार शरद पवार, खासदार सुप्रियाताई सुळे, डॉ. सी.डी. मायी, वसंत काळपांडे यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.

सचिन देसाई यांची फेलोशिपसाठी निवड झालेबद्दल शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर, आशा उबाळे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्तार अधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख आबासाहेब पसारे, संजय कुकडे यांनी अभिनंदन केले आहे.






- **उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी :-**

उपक्रमाच्या अंती निरीक्षण केले असता उपक्रमातील विविध कृती कार्यक्रमांच्यामुळे मुलांच्यात खालील सकारात्मक बदल घडून आल्याचे लक्षात आले.

- आनंदपूर्ण कृती व खेळातून मुले नवीन गोष्टी शिकण्यात आनंद व उत्साह वाटू लागला.
- मुलांचे वाचन योग्य गती, आरोह-अवरोह व आत्मविश्वासपूर्वक होऊ लागले.
- मुलांना अवांतर वाचनाची गोडी लागली.
- मुलांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली.
- मुले सुवाच्छ, वळणदार व सुंदर लेखन करण्यात आनंद मिळवू लागली.
- एखाद्या गोष्टीचे वर्णन सोप्या शब्दात सांगू अथवा लिहू लागली.
- मोबाईल, टॅबचा वापर मनोरंजासाठी न करता नवीन माहिती मिळवण्यासाठी करु लागली.
- गणित विषयातील अवघड प्रश्न व कुटप्रश्न मुले आवडीने सोडवू लागली.
- सभोवतालच्या प्रत्येक वस्तूचा भौमितिक आकार कोणता आहे हे अचूक सांगू लागली.
- शिवणकाम, नक्षीकाम, रांगोळी काढणे, मेहंदी काढणे यासारखी कौशल्ययुक्त कामे मुले आवडीने करू लागली.
- मुले घरातील कामात पालकांना मदत करू लागली.
- शाळेतील न्युट्रीशन गार्डन पाहून मुलांनी आपल्या घरच्या परिसरातही परसबाग तयार केली.
- मुलांना QR कोड स्कॅन करण्याचे तसेच QR कोड बनवण्याचे कौशल्य प्राप्त झाले.
- मुलांनी प्लास्टिक ऐवजी कापडी पिशवी वापरण्यास सुरवात केली.
- अपरिचित इंग्रजी शब्दाचा, वाक्याचा मराठी अर्थ गुगल ट्रान्सलेटर च्या सहाय्याने शोधू लागली.
- इतर धर्माबद्दल तसेच इतर धार्मिक लोकांच्याबद्दल आदर बाळगू लागली.
- परिसरात घेतले जाणारी पिके व केले जाणारे व्यवसाय यांची नावे मुले सहजपणे सांगू लागली.
- दुखापत झाल्यास मुले प्रथोमपचार पेटीतील साहित्याचा वापर करू लागली.
- परिसरात उपलब्ध असणाऱ्या औषधी वनस्पतीचा मुले उपयोग सांगू लागली.
- मराठी व इंग्रजी भाषेतील शब्द व सोपे छोटे उतारे याचे टायपिंग करता येऊ लागले.
- बेंचवरील QR कोड स्टीकर स्कॅन करून मुले स्वतः ऑनलाईन मराठी स्टोरी ऐकतात.
- गुगल लेन्सचा वापर करून मुले वनस्पतीची अधिक माहिती गोळा करतात.
- शर्ट चे बटण तुटले तर मुले स्वतः नवीन बटण जोडू लागली.
- आपल्या वर्गमित्रांना कामात मदत करू लागली, मुलांच्यामधील भांडणे कमी झाली.
- मुले अचूकपणे मराठी व इंग्रजीमधील वार, महिने यांची क्रमवार नावे सांगतात त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देतात.
- मुले भविष्यात आपणास कोण बनायचे आहे ? कोणता व्यवसाय करायचा आहे ? याबाबत विचार करू लागली.
- प्राणी, पक्षी व वनस्पती यांना इजा करण्यापेक्षा त्यांची काळजी घेऊ लागली.

- या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे <u>राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी</u>

( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )

| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| कविता विनायक चौगले | विद्या मंदिर सोनाळी | ९४२१३६६१३८ |
| मनिषा मनोहर गामणे | Z.P.P.SCHOOL | 8286979980 |
| Pallavi Pravas Gatkal | NARODEVASTI(PATHRE BU) | 9370027601 |
| ज्ञानदेव विठ्ठल भोसले | चाफवली नं.१ | 9763138142 |
| संजय बाबुराव नांगरे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओंडोशी | 9923174411 |
| Sandip Shivaji Mahekar | Vidya Mandir Vikaswadi Savarde | 9923776907 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | Bu\|\| | 9420948648 |
| Gaikwad Dilip Ganpat | पिंपळगाव माळवी | 9730574872 |
| Samadhan Namdev Pawar | Sant tukaramnagar | 9922189974 |
| संभाजी बाबूराव खामकर | Z P Pri School Vanasgaon Tal | 9860660524 |
| पठाण एन. जी. | Niphad Dist Nashik | 9423246143 |
| धनश्री शितल यलगुडे | कन्या वि.मं. मुरगूड. ता.कागल.. | 7741006679 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. | 8007917177 |
| श्री.अंकुश सदाशिव माने | परतूर | 8975966624 |
| अश्विनसिंग अंगदसिंग राजपूत | कुमार विद्या मंदिर तेरवाड | 9850513258 |
| नरवाडे बाजीराव विश्वनाथ | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | ९४२२९३८१५५ |
| Joyce Florian Dsouza | विद्या मंदिर बेलवळे बु।। ता.कागल जि. | 9028242338 |
| श्री .प्रदीप विठ्ठल नाळे | कोल्हापूर | 9404114869 |
| Altab Bashir Bagwan | जि. प.प्रा. शाळा नानेगाव | 9594983611 |
| HIDAYAT MULLA | जि.प.के.प्रा.शा.पानकनेरगाव | 7385300742 |
| जयप्रकाश हरिदास कांबळे | St.peter church marathi pratmik | 9850586060 |
| सौ अलका रमेश ढवळे | shala Arnala | 9764669444 |
| Manoj Shivajirao Kamble | श्री महालक्ष्मी वि.मं.कोकिसरे | 9665438005 |
| Shendage Sandip Krishna | ZPP SCHOOL | 8788225655 |
| Sarjerao Dhulappa Patil | NANDURVIHIRE | 9158337834 |
| रमेश महाडीक | dr APJ ABDUL KALAM N P | 7798727330 |
| Manisha Laxman Nerkar | URDU SCHOOL NO 57 | 9011289522 |
| JAIPRAKASH MADHAVRAO | ICHALKARANJI | 9421767520 |
| INGLE | ZPPS नरसिंहपूर | 9096505176 |
| ज्योती भिमाशंकर चौंडे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किरपे. | 9623699583 |
| Ranjana Mallikarjun Hasure | तालुका कराड | 9421366138 |
| सौ . कविता विनायक चौगले | Z P P School Hajjapur | 9665934991 |
| अजित प्रभाकर संगवे | Kanya vidya mandir vasagade | 9881412421 |
| सुनिता श्रीधर ढालपे | Kumar v m kacbha Thane | 8007876674 |
| RAJU MAHADEV NANNORE | जि प शाळा मालदन | 9021418318 |
| संजय बाबूराव चोथे | Z.P . School Somthandesh | 7588561176 |
| Lahu Arjun Pimple | Z.P.H.S. SAHAPUR TQ. | 8055652784 |

- या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे <u>राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी</u>

( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )

| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| Nivedita chandrakant Madiwal | Marathi Vidyamandir Rajapur | 9404421588 |
| श्री.नवनाथ विष्णु सांगळे | z.p.semi English school maneganv | 9921007089 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | 8007917177 |
| Sandhyarani pradip yevale | Z.p.school ,ghanvatmala (Bagani) | 7588627020 |
| Pravina maitre | Z P.Upper.Pri..School Kolona chore | 9552129895 |
| वाघडोळे राजकुमार बालाजी | जि प प्रा शा राजेगाव | 9405820963 |
| SAYYAD ASMA | Z.p.p.s Mahadevnagar | 9766478378 |
| CHANDMUBARAK | Z.P.P.S.Ghansargaon | 9404682138 |
| Chavan Arun Nagnath | ZPPS राजपिंपरी | 9623483048 |
| वांगीकर अंजली माणिकराव | Z.p.school Khirpuri Khurd | 9011559066 |
| Manohar Akhare | Z.P.School Vinchur | 9011785157 |
| Vaishali Ganpat Sonawane | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनवडेवाडी | 9890449115 |
| कांचन शिवाजी सनगर | Vidya Mandir Mahadikwadi | 8788420147 |
| Archana Pramod Korane | V.M.Akurde | 9921186604 |
| Ashwini Ravindra Bhalekar | Vidya Mandir Donvade | 9404990640 |
| Ashwini Rajendra Shinde | Z P Upper pri.School Pipri | 9763084635 |
| Marathi Ramdas Ratbod | Z. P. Primary school Bopapur | 9970614973 |
| Ku. Meenakshi Girdharrao Ganvir | (dighi) | 8788225655 |
| Shendage Sandip Krishna | Kanya vidya mandir vasagade | 9423246143 |
| पठाण एन. जी. | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. | 9923936116 |
| Anupama bhujangrao petkar | परतूर | 8379909499 |
| Ganesh Namdev kare | Z.p.upper primary school chanki | 9403935966 |
| Sujata Ravindra Borude | Vidya mandir kondigre .Tal shirol | ८७७९०७०६९१ |
| राजश्री सुधाकर माने | Z.pp school Kaudgav | 9421767520 |
| JAIPRAKASH MADHAVRAO | जिल्हा परिषद शाळा नंबर २ आकिवाट | 9822762272 |
| INGLE | Z.P.H.S. SAHAPUR TQ. | 7709232492 |
| Kallappa sidram pujari | DEGLOOR | 7875293476 |
| कृष्णा अशोक शिलवंत | Kumar v. M. Dattwad | 9881412421 |
| ज्योती संतोष उतेकर | विद्या मंदिर अनफवाडी जि. कोल्हापूर | 9420948648 |
| सुनिता श्रीधर ढालपे | लंगडी | 9404395080 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | जि प शाळा हनुमंतवाडी (सोमंथळी )तालुका | 9370027601 |
| Jayendra Ganpat Chavan | - फलटण | 9860660524 |
| Pallavi Pravas Gatkal | पिंपळगाव माळवी | 9881022057 |
| संभाजी बाबूराव खामकर | ZPPS Shirgaon Kondoshi | 7385300742 |
| दमयंती शिवाजी ठोके | Z.P.P.SCHOOL | 9922665846 |
| विवेक पुरूषोत्तम पाटील | NARODEVASTI(PATHRE BU) | 7843081146 |


- **माहितीचे विश्लेषण व आलेख तक्ते :-**

या नवोपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची आंतरक्रिया योग्य प्रकारे साधली गेली. मुक्त, आनंदपूर्ण व सुरक्षित वातावरणात मुलांनी शिक्षणाची अनुभूती घेतली यातून आपेक्षित उद्दिष्ट साध्य झाले. आवश्यक गुणात्मक पातळीत वाढ झाली. बालकाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यात यश प्राप्त झाले. नवोपक्रम च्या सुरवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली होती. यात विद्यार्थी क्षमता, कौशल्य आणि वर्तन यांचे निरीक्षण करून योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रमअंती अशीच समांतर निरीक्षणात्मक उत्तर चाचणीही घेतली. या सर्वातून मुलांच्यातील समाधानकारक बदल, प्रगती व त्याचा आलेख दृष्टीक्षेपात आला.

**विद्यार्थ्यांच्यामध्ये उपक्रम पूर्वस्थिती व उपक्रमोत्तर स्थिती मध्ये झालेली गुणात्मक वाढ**

एकूण पटसंख्या १३ निरीक्षण केलेली विद्यार्थी संख्या १३

| अ. क्र | निरीक्षण केलेली क्षमता, कौशल्य / अध्ययन निष्पती | पूर्वचाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१३ पैकी) | उत्तर चाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१३ पैकी) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | न अडखळता योग्य गतीत वाचन करणारे | ८ | १३ | ३८.४६ % |
| २ | सुवाच्छ व वळणदार अक्षरात लिहणारे | ७ | १३ | ४६.१५ ०% |
| ३ | अचूकपणे वार व महिने सांगणारे | ६ | १३ | ५३.८४ % |
| ४ | १५ पर्यंत पाढे पाठ असणारे | ३ | ११ | ६१.५३% |
| ५ | मराठी किंवा इंग्रजी अक्षरे टाईप करणारे | १ | १३ | ९२.३० % |
| ६ | QR कोड स्कॅन करता येणारे | २ | १३ | ८४.६१ % |
| ७ | कपड्याला स्वतः बटण लावू शकणारे | ४ | १३ | ६९.२३% |
| ८ | आपण कोण होणार ? याचे उत्तर निश्चित असणे | ३ | १३ | ७६.९२ % |
| ९ | कोणत्याही वस्तूचा भौमितिक आकार अचूकपणे ओळखणारे | ७ | १३ | ४६.१५ % |
| १० | जोडणीकाम 'टूल बॉक्स' मधील सर्व साधनांची नावे माहिती असणारे | ० | १३ | १०० % |
| ११ | न समजलेल्या गोष्टीबद्दल, अपरिचित गोष्टीबद्दल स्वतःहून प्रश्न विचारणारे | १ | १३ | ९२.३० % |
| १२ | शालेय वाचनालयातील पुतके वाचण्यास घेणारी | ४ | १२ | ६१.५३ % |




**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली तंत्रे</u>**

- मुलाखत
- निरीक्षण

**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली साधने</u>**

- प्रश्नावली
- पडताळा सूची
- पदनिश्चयन श्रेणी

## इयत्ता २ री नवोपक्रम अंतिम स्थिती

( मूल्यमापन तंत्र- परिपूर्ण क्षमता/ कौशल्य प्राप्त = √   क्षमता/ कौशल्य अप्राप्त = X )

| अ. क्र. | विद्यार्थी नाव | भाषा क्षेत्र निर्धारित अध्ययन निष्पती | गणित क्षेत्र सर्व अध्ययन निष्पती | पर्यावरण जागरुकता जाणीव | मुल्ये व जीवन कौशलये |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटील साईराज सुनिल | √ | √ | √ | √ |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | √ | √ | √ | √ |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | √ | √ | √ | √ |
| ४ | वांजोळे विराज विजय | X | √ | √ | √ |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | √ | √ | √ | √ |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | √ | √ | √ | √ |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | √ | √ | √ | √ |
| ८ | संकपाळ शुभम बबन | √ | X | √ | √ |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | √ | √ | √ | √ |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | √ | √ | √ | √ |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | √ | √ | √ | √ |
| १२ | संकपाळ शिवन्या शिवाजी | √ | √ | √ | √ |
| १३ | वांजोळे अथर्व दीपक | √ | √ | √ | √ |

- **कार्यवाहीत आलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना :**

नवोपक्रम राबवत असताना काही समस्या आणि अडचणी आल्या पण त्यांचा सारासार विचार करुन प्रसंगी अनुभवी, तज्ञांचे तसेच वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवून समस्या सोडवण्यात आल्या. योग्य पर्यायांचा विचार करण्यात आला.

**1 ) उपक्रम अंतर्गत तंत्रज्ञानाची मुलांच्यामध्ये आवड निर्माण करण्यासाठी शाळेमध्ये काही आय.सी.टी. उपकरणे आवश्यक होती. प्राप्त परिस्थितीमध्ये मर्यादित साधने होती.**

➢ उपक्रम यशस्वी करण्यासाठी काही तांत्रिक साधने आवश्यक होती ती पूर्ण करण्यासाठी लोकसहभागाचे आवाहन करण्यात आले. सर्व गावाने आर्थिक मदत पूर्ण करून शाळेचे माजी विद्यार्थी डॉ.बी.डी.पाटील यांनी मोठे योगदान दिले. शाळेत आपल्या वडिलाच्या स्मरणार्थ आय.सी.टी. लॅब बांधून दिली. याशिवाय शिक्षणाधिकारी श्री. आंबोकर यांनी शाळेतील उपक्रम पाहून टॅब संच भेट दिलेत. यासर्व संगणकीय सुविधा उपलब्ध झालेने उपक्रम सफल झाला.

**2 ) व्यावसाईक व कारागीर यांच्या कामाची प्रत्यक्ष ओळख करून द्यायची होती पण गावात सर्व कारागीर उपलब्ध नव्हते.**

➢ ज्या कामाचे कारागीर स्थानिक पातळीवर उपलब्ध नसतील त्यांची ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली किंवा रेकॉर्डिंग करून मुलांना चित्रफित दाखवण्यात आली. काही व्यावसाईकांची ओळख प्रोजेक्टर स्क्रीन वर यु ट्यूब च्या सहाय्याने दाखवण्यात आली.

**3 ) उपक्रम अंतर्गत पाककृती, रांगोळी, मेहंदी काढणे, शिवणकाम आदी कामासाठी महिलांची गरज होती.**

➢ वरील सर्व कामे महिला सफाईदारपणे करत असतात. या कामासाठी गावातील महिला बचत गट पुढे आला त्यांनी आपला बहुमोल वेळ देऊन मुलांना मार्गदर्शन केले, प्रात्यक्षिके घेतलीत. शाळेच्या माजी विद्यार्थीनींनी देखील सहकार्य केले.

**४ ) 'सुंदर माझे अक्षर' हा हस्ताक्षर प्रकल्प घेण्यासाठी सर्व मुलांच्याकडे चांगल्या दुरेघी सुलेखन वह्या आवश्यक होत्या. आर्थिक परिस्थितीमुळे सर्व मुलांना चांगले पेन व वह्या खरेदी करणे शक्य झाले नाही.**

➢ ' मित्राचा वाढदिवस, आनंदाचा दिवस' या उपक्रम अंतर्गत काही मुलांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वर्गातील मित्रांना शैक्षणिक साहित्य वाटले. यामधून काही मुलांची गरज पूर्ण झाली, शिवाय मुलांच्यात सहकार्य करण्याची प्रवृत्ती व स्नेहभाव वाढला.

## ❑ ६. उपक्रमाची फलनिष्पत्ती / यशस्विता (उदिष्टानुसार)

मुलांना शिक्षणात गोडी वाढवण्यासाठी, सर्वांग विकास साध्य करण्यासाठी सर्व गोष्ठी नियोजनपूर्वक करता आल्याने, पालकांची साथ व वरिष्ठांचे मार्गदर्शन प्राप्त झालेने या प्रयत्नात आम्ही यशस्वी होवू शकलो. आम्ही निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करू शकलो.....

- **१. वर्गातील १००% विद्यार्थ्यांनी सर्व विषयातील सर्व क्षमता प्राप्त करून प्रगत होण्यासाठी अनुरूप वातावरण निर्मिती करणे.**

वर्गातील सर्व मुलांनी इ २ री च्या सर्व मुलभूत क्षमता व अध्ययन निष्पती साध्य केली. वाचन, लेखन, भाषण, संभाषण या क्षमतेवरही प्रभुत्व संपादन केले. गणितीय साक्षरता प्राप्त झाली. गणिताच्या गोष्टी व सरप्राईज टेस्ट यामुळे गणिताची चांगली तयारी झाली. इंग्रजी विषयातील भाषिक तयारी, शब्दसंपत्ती व संभाषण कौशल्य वाढवण्यास उपक्रम लाभदायक ठरला पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांचा तुलानाताम्क अभ्यास करता मुलांच्यात अपेक्षित वर्तन बदल दिसून आला. १००% विद्यार्थी प्रगत करण्यास उपक्रम लाभदायक ठरला.

- **२. बालकांना नवनिर्मितीचा विचार करण्यास प्रवृत्त करणे.**

नाविन्यपूर्ण कृती कार्यक्रमातून व प्रयोगातून मुलांच्यामध्ये नवनिर्मितीची आवड निर्माण झाली. नवीन काम करण्यात मुले उत्साहाने भाग घेऊ लागली. मुलांनी स्वतः शालेय बागेत सुकलेल्या फुलापासून ज्ञानाचे रोपटे बनवून शाळेत सुंदर अशी शब्दबाग खुलवली. घरातील टाकाऊ वस्तूपासून काही वस्तू बनवता येईल का ? याचाही मुले विचार करून प्रयत्न करू लागली. उदा. घरातील शिल्लक कागदी खोक्यापासून मुलांनी चिमण्याच्यासाठी घरटी बनवली.

- **३. मुलांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होईल अशी संधी निर्माण करणे.**

शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला शाळेत ICT CENTER ची उभारणी करण्यात आली त्यामुळे शाळेत तंत्रज्ञान शिकण्यासाठी अनुकूल वातावरण व सुविधा प्राप्त झाल्या. ॲप चा वापर, स्मार्ट बोर्डचा वापर, Tab चा वापर नवीन ज्ञान मिळवण्यासाठी करू लागली. आपल्या कल्पकतेने काही साहित्य बनवून दाखवू लागली. फौंडेशन कोर्समुळे मुलांना कौशल्ययुक्त व तांत्रिक कामासाठी कामासाठी लागणाऱ्या साहित्याची ओळख झाली.

- **४. परिसराची व मुलभूत व्यवसायिक ज्ञानातून जीवनकौशल्यांची ओळख करून देणे.**

मुलांना क्षेत्रभेट, शेतीभेट , कारखाना भेट तसेच बलुतेदार व्यवसाय भेट यातून परिसराची परीसारतील व्यवसायांची ओळख करून दिली. परिसरातील आवश्यक मुलभूत माहितीचे ज्ञान झाले. पर्यावरण जपणूक करण्याची जागृती करण्यासाठी ‘प्लास्टिकमुक्त रविवर’ सारखे उपक्रम लाभदायक ठरले. रांगोळी, चित्रकला, नक्षीकाम, परसबाग लागवड या कामांची ओळख झाली. विविध कौशल्याची ओळख व आवड निर्माण झाली. कोणतेही काम करण्यात कंटाळा न करता मुले उत्साहाने भाग घेऊ लागली. घरातील कामातही सहकार्य करू लागली. आपल्या भविष्याबद्दल मुले विचार करू लागली.

- **५. विद्यार्थ्यांच्यामध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करून आत्मविश्वास वाढवणे**


उपक्रमाच्या सुरवातीलाच मुलांच्या आवड निवड लक्षात घेण्यासाठी त्यांना विशिष्ट प्रश्नावली देण्यात आली होती. त्यां आधारवर मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. 'सुंदर माझे अक्षर हस्ताक्षर' प्रकल्पातील उत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांच्यासाठी शिल्ड प्रमाणपत्र देऊन प्रबलन देण्यात आले. मुलांना कृती उपक्रम अगर प्रात्यक्षिक मधील कामाचे अभिनंदन करण्यासाठी विशेष शिक्के बनवण्यात आले, ज्यावर स्टार किंवा अभिनंदन रिमार्क टाकण्यात आला. फौंडेशनल कोर्स पूर्ण केल्यावर मुलांच्यासाठी विशेष सर्टिफिकेट तयार करून वाटप करण्यात. या सर्व गोष्टीतून मुलांना उत्कृष्ठ कार्य करण्याची प्रेरणा मिळाली व आत्मविश्वासही वाढला.

- **६. सुप्त क्षमतांच्या विकासास संधी देऊन सर्वांगीण विकास साधणे.**

या उपक्रम अंतर्गत भाषण, गायन, कला, क्रीडा, लेखन, कलाकुसर या सर्व गोष्टींची संधी मिळेल अशा गोष्टींची निश्चिती केली होती. मुलांचा भाषण कौशल्य विकास करण्यासाठी वैशिष्टपूर्ण असे 'बालकांचे वक्तृत्वविश्व' हे QR कोड सुविधायुक्त असलेले, राज्यातील पहिलाच प्रयोग ठरलेला अनोखा 'भाषण संग्रह' पुस्तक पुस्तक लिहून प्रकाशित करून त्याच्या १००० प्रतींचे मोफत वाटप केले. मुलांना म्युजिक सिस्टीमवर गायनाची संधी दिली. कार्यानुभव अंतर्गत घेतलेल्या उपक्रमातून हस्तकौशल्याचा विकास झाला.

- **७. शिकण्यातील आनंद मिळवण्याच्या प्रवृत्तीस चालना देणे.**

मुले नेहमी प्रसन्न राहू लागली. मुले एक हि दिवस शाळेत गैरहजर राहिली नाहीत. प्रत्येक उपक्रमात मुलांनी आवडीने सहभाग घेतला, याशिवाय त्यांच्या पालकांनी देखील आनंदाने सहभाग घेतला. मुलांना रोज 'माझी आठवण' ही दैनिदिनी लिहण्यास सांगितली जाते यामध्ये मुलांनी सकारात्मक नोंदी केल्या असल्याचे निदर्शनात आले.




**उपक्रमातून साध्य झालेली विद्यार्थी सर्वांगीण विकासाची विविध क्षेत्रे**


## नवोपक्रमबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय ....


२रे 👣 आनंदी शिक्षणाची चाहूल
abr, Abr, Abr, Abr, Abr, add paya, Ajay Vard...
दिला आहे. 19:43

Ankush Rathod chilkhal dara
You
Photo
खूप छान ,देसाई सर हा उपक्रम अतिशय उत्कृष्ट आहे ,तुमच्या नवनवीन संकल्पना पाहून तुमचं करावं तेवढं कौतुक कमी आहे खूप खूप अभिनंदन ,सहज आणि सोप्या पध्दतीने तुम्ही मांडत आहात, 💐💐
💐🌹👍👍 20:01

Ghnshyam Sonvane Sir Dahanu
You
#विद्यार्थी सूचना:
आजची सुलेखन सराव अक्षरे :
उ व ऊ...
Thanks देसाई सर .....तुमचा हा उपक्रम माझ्या वर्गातील मुलांना फारच उपयोगी पडत आहे....मी नियमित मुलांना send करत असतो...विद्यार्थी फारच चांगल्याप्रकारे प्रतिसाद देत आहेत....😊👏 21:07

raigad sir
Ghnshyam Sonvane Sir Dahanu
Thanks देसाई सर .....तुमचा हा उपक्रम माझ्या वर्गातील मुलांना फारच उपयोगी पडत आहे....मी नियमित मुलांना send करत असतो...विद्यार्थी फारच चांगल्याप्रकारे प्रति...
मि सुद्धा👍👍 21:08
घेत आहे 21:08


SMART EDUCATION 7
Abr, Abr, Add, ajit, amol, Ankush, arohi, azi...
20:04

समीर जाधव उस्मानाबाद
You
Video (1:13)
देसाई सर आपल्या कामाचा आम्हाला हेवा वाटतो .संपूर्ण राज्यासाठी आपले काम म्हणजे प्रेरणा आहे .आपल्या कामाने निश्चितच आपली राज्यभर ओळख झाली आहे. कुठल्याही पुरस्काराची अपेक्षा न ठेवता आपण जे निरपेक्षपणे शाळेसाठी केवळ आपल्या मानसिक समाधानासाठी काम करत आहात ते कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहे. केवळ भौतिक सुविधांनीच शाळा संपन्न केलात असे नाही तर आपले विविध उपक्रम, आपले बोलके विद्यार्थी, आपण राबवत असलेल्या विविध स्पर्धा , इत्यादी माध्यमातून कृती, उपक्रम ,ज्ञानरचनावादासंगे प्रवास आमचा गुणवत्तेकडे हे साध्य आपण साधत आहात. आपले मन:पूर्वक अभिनंदन आपल्या पुढील कार्यास मनापासून खूप शुभेच्छा👍
शाळेत तुम्ही राबवत असलेल्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभाग नोंदवणाऱ्या आणि यशस्वी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन🌹🌹 20:21


09:44 65%
२रे 👣 आनंदी शिक्षणाची चाहूल
abr, Abr, Abr, Abr, Abr, Abr, add paya, Ajay...
anita Mam
You
Marathi word reading for std 1.pdf (17 pages)
👌💐👍 07:31


pandharpatte mam
You
Marathi word reading for std 1.pdf (17 pages)
Khup chhan 07:58

दीप्ती मॅडम मुंबई
You
Photo
हा उपक्रम मला खूपच आवडला.माझी मुले असे लिहिण्याचा प्रयत्न करू लागली आहेत.
Thank u sir🙏🙏🙏🙏🙏 09:16

Waghmode Yavatmal Sir
You
Photo
माझ्या शाळेत ही सुरू केला आहे हाच उपक्रम👌 09:20

Dongare Satara Cards
अक्षर गट आणि उतारा वाचन व लेखन मीही माझ्या शाळेत चालू केले आहे आणि त्याचा मुलांना खरंच खूप फायदा होतोय.🙏🙏 09:23


Thikane sir Hingoli
10 January 2022
You • Status
'दैनिक सकाळ' ने घेतलेली दखल 🙏
💐💐💐 07:33
Today
You • Status
बशाचामोळा शाळेत लवकरच साकारतोय नवा गुणवत्तापूर्वक अभिनव उपक्रम ...'१००% स्टडी टेबल फॉर स्टूडंट्स' प्रजासत्ताक दिनाचु...
देसाई सर आपली कल्पकता आणि विद्यार्थ्या प्रती असलेली धडपड शब्दात व्यक्त नाही करता येत.मी आपल्यासोबत दोन ते तीन वर्षापासून आहे.(मनाने) बशाचा मोळा शाळेची यशोगाथा आपल्या स्टेटस मधून व्हॉट्स ॲप ग्रुप वरून पाहतोय.परंतु हा प्रवास प्रत्यक्षात पाहताना खूपच आनंद होईल.कधी योग आला तर नक्कीच भेट होईल हा प्रवास करताना आलेल्या अडचणी केलेली मात ह्या गोष्टी एखाद्या डॉक्युमेंट्री मधून किंवा एखाद्या छोट्या चित्रपटातून समजून घेता येईल.🙏🙏🙏 13:29
🙏 13:31
आपले पूर्ण नाव व शाळा ? 13:31
Nagesh Baburao Thikane 13:42
Zpps kahakar bk 13:42


बागबान बशीर अ. नगर
(कोल्हापूर)
लिंक :
https://youtu.be/YHjTR14TeCs
20:17
You
राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा 2021/22 पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी SCERT PUNE या ठिकाणी प्राथमिक शिक्षक गट प्र...
सर्व प्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन आपणास अभिमानाने सांगू इच्छितो आपण केलेल्या प्रामाणिक प्रयत्न म्हणून महाराष्ट्रातील तमाम शिक्षक बांधवांना आणि विशेषत : माझ्यासारख्या शिक्षकाला आपल्या सर्वच उपक्रमाचा खूप खूप फायदा झाला आणि भविष्यातही होत राहत आहे .आणि आपल्या प्रत्येक नवीन उपक्रमातून आम्हाला एक नवी प्रेरणा भेटते तसेच एक नवीन ऊर्जा व स्फूर्ती भेटते आणि आम्ही नेहमी विचार करतो सचिन सर इतकं मोठं कार्य अतिदुर्गम भागात जर करत असतील तर आपण का नाही कराव आणि म्हणूनच तुमच्या प्रेरणेतून शाळेतील प्रत्येक कार्य प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न मी नेहमीच करतो .खरोखरच आपलं कार्य कौतुकास्पद अवर्णनीय आहे. भविष्यातही नेहमीच आपल्याकडून चांगले चांगले उपक्रम निर्माण होवो व आमच्या सारख्या शिक्षकांना त्याचा उपयोग होवो .त्याबद्दल यापुढेही कार्यासाठी आपणास खूप खूप मन:पूर्वक शुभेच्छा 20:48
🙏 20:48


२रे 👣 आनंदी शिक्षणाची चाहूल
abr, Abr, Abr, Abr, Abr, add paya, Ajay Vard...
👌👍 08:25

chandrkant vispute
You
Photo
👌👌👌 13:07

+91 94209 06694 ~surupsingmavali815
सन्मानीय देसाई सर आपण जे उपक्रम राबवित आहात अतिशय उत्कृष्ट आहेत..आतापर्यंत तुमच्या माध्यमातून इ.१ ली व २ री साठी बरेच नवनवीन उपक्रम पहायला मिळाले व राबवता आले.आपले खूप-खूप धन्यवाद!🙏🙏🙏
असाच व्हाट्स ग्रुप इ.३ री साठी असेल तर कृपया त्या ग्रुपला मला ॲड करा..🙏🙏🙏👍 13:11

# ❑ ७. समारोप

सन २०२२/२३ या शैक्षणिक वर्षात 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल...' हा इयत्ता २ री विशेष नवोपक्रम म्हणजे मुलांच्या संपूर्ण पायाभूत व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक प्रयत्नांचा, उपक्रमांचा एक सुंदर मिलाफ होता. **वर्गातील १३ मुलांच्यासाठी राबवलेला हा उपक्रम त्याच्या यशस्वीतेमुळे संपूर्ण राज्यभर स्विकारला गेला.** यातील अनेक कृती, प्रकल्पांचे राज्यभर अनुकरण करण्यात आले. मला आनंद वाटतो की, सदर उपक्रम माझ्या शाळेतील मुलांच्यापुरता मर्यादित न राहता हजारो मुलांना याचा लाभ झाला. अनेक कृतीमध्ये जोडवर्ग ३ री ला देखील समाविष्ट करून घेण्यात आले. त्यामुळे दोन्ही वर्गातील मुलांच्यासाठी हा उपक्रम लाभदायक ठरला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, पालक, समाज व पर्यवेक्षीय यंत्रणा यांचे योग्य सहकार्य मिळाले, त्या सर्वांचे मी आभार मानत आहे. मुलांच्यात झालेला अपेक्षित वर्तनबदल हीच उपक्रमाची खरी फलश्रुती आहे.

- **या उपक्रमामुळे मुलांच्यात घडून आलेले सकारात्मक बदल :-** या नवोपक्रममुळे माझी सर्व मुले खऱ्या अर्थाने प्रगत बनली त्याच्यात झालेले गुणात्मक आणि भावात्मक बदल खालील प्रमाणे....

१ ) मुलांच्या वाचनात सुधारणा झाली, शिवाय वाचनाची आवड निर्माण झाली.

२ ) मुलांच्या लेखनात सुधारणा झाली. मुले आपले विचार लेखनातून व्यक्त करू लागली.

३ ) संगणक, टॅब, V R BOX, ALEXA DIVICE आदी. साधने योग्यरित्या हाताळतात.

४ ) स्वतः विषयी आणि कुटुंबाविषयी आत्मविश्वासाने माहिती सांगतात.

५ ) मुलांना नवीन काहीतरी शिकण्याबद्दल आवड निर्माण झाली.

६ ) मुलांच्या सृजनशीलतेचा विकास झाला.

७ ) हस्तकौशल्याचा विकास झाला.

८ ) पालक व समाज यांचा शाळेशी समन्वय वाढला.

९ ) गणित विषयाची आवड निर्माण झाली.

१० ) गणितीय ज्ञानाचा व्यावहारिक व उपयोजनात्मक वापर करू लागली.

११ ) श्रमप्रतिष्ठा निर्माण झाली.

१२ ) इंग्रजी भाषा बद्दल गोडी निर्माण झाली.

१३ ) शब्दसंपत्ती वाढली.

१४ ) श्रावण, भाषण, वाचन व लेखन या सर्व क्षमतांचा विकास झाला.

१५ ) गणितीय साक्षरता मुलांच्यात निर्माण झाली.

१६ ) मुलांना तंत्रज्ञानाची गोडी वाढली.

१७ ) एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढली.

१८ ) कल्पकतेला व विचारक्षमता यांना चालना मिळाली.

१९ ) सर्वधर्म समभाव निर्माण झाला.

२० ) १००% विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला

# ❑ ८. संदर्भ व परिशिष्टे

सदर उपक्रम राबवण्यापूर्वी तसेच राबवत असताना अनेक संदर्भ साहित्याचे वाचन केले ज्यामुळे मला नवोपक्रम राबवण्याची तसेच त्याच्या अहवाल लेखनाबाबत योग्य मार्गदर्शन व दिशा मिळाली. नवोपक्रम राबवताना कोणत्या पायऱ्यांनी जावे ? कोणती साधने वापरावीत ? कोणाकोणाची मदत घ्यावी ? अशा अनेक प्रश्नाची उकल झाली. माझा हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी खालील संदर्भ साहित्याचे मला मोलाचे योगदान लाभले.


- **जीवन शिक्षण मासिक – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे. ऑगस्ट २०२१ (FLN विशेष )**
- **शिक्षण संक्रमण मासिक- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे (जुलै २०२१)**
- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**
- **भारत सरकारच्या निपुण भारत विषयक मार्गदर्शक सूचना दि. १६/०७/२०२१.**
- **मैत्री करूया गणिताशी**
- **मूल घडत कसं ? घडवा तुम्हाला हवं तसं ... - योगेश कोरे ( होम रिव्हाईज पब्लिकेशन्स )**
- **मुलांच्या बुद्धीमता विकसित करण्याच्या २१ पद्धती - मनोज अंबिके**
- **विद्याप्रवेश**
- **शिकू आनंदे मराठी**
- **मैत्री – लोकसत्ता वृत्तपत्र विशेष लेखमाला (सन २०२०)**
- **मेंदूचा पासवर्ड – डॉ. श्रुती पानसे**
- **उपक्रमशीलतेकडून कृतिशीलतेकडे – सिद्धराम माशाळे , अभिषेक प्रकाशन**
- **कृती संशोधन नवोपक्रम - स्वाती गाडगीळ, सुविचार प्रकाशन (२००६ )**
- **कृती संशोधन व नवोपक्रम – व. झा. साळी व सुरेश करंदीकर, फडके प्रकाशन , (२००६)**
- **दिशा नवोपक्रमाच्या -संपादक शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. (२०१५)**
- **स्वअध्ययन साहित्य निर्मिती हस्तपुस्तिका १ ते ४**
- **नवोपक्रम प्रकल्प उपयोग , चित्रलेख प्रकाशन – डॉ. सुधाकर गायकवाड**
- **शिक्षा मे नवाचार – सुरेश शिंगणे, तन्मय प्रकाशन, , २०१४**
- **ध्यास गुणवत्तेचा शोध नवोपक्रमशीलतेचा - शामुकांत रुळे, प्रशांत पब्लिकेशन २०१६**

# परिशिष्ट - अ

## महत्वपूर्ण लिंक

**‘दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल’** या उपक्रमा संदर्भातील तपशीलवार माहिती व पुरावे आपणास खालील लिंक यादीद्वारे सहजपणे दृष्टीक्षेपात येईल.

- **नवोपक्रमबाबत संपूर्ण माहिती संदर्भ व्हिडिओ संग्रह :**
- https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnyi_FDrMuhjyGLTulkSphYs

- **हस्ताक्षर सुधार प्रकल्पातील सर्व सुलेखन नमुने व पुरावे संग्रह (गुगल ड्राईव्ह) लिंक** : https://drive.google.com/drive/folders/1itFL1ODYb3j0IR_mSceLw7GgbbMN4-mP?usp=share_link

- **मराठी वाचन लेखनासाठी स्वनिर्मित ई- साहित्य ( पीडीएफ व फ्लिपबुक आवृत्ती )**
- https://desaisachin.blogspot.com/2020/10/my-digital-book.html

- **सरप्राईज टेस्ट १**

I. https://forms.gle/mYg8Zv4eq9f3Vna58

II. shorturl.at/bkOR3

- **सरप्राईज टेस्ट २**

I. https://forms.gle/DM7UvbKHpeM3D1zv8

II. shorturl.at/nX149

- **सरप्राईज टेस्ट 3**

I. https://forms.gle/PD6CqJTAbGfXuB4d7

II. shorturl.at/QX017

- **आम्ही छोटे संपादक उपक्रम**
- https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU

- **न्युट्रीशन गार्डन**
- https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnwmcj_f-3dZtDnl9o8_KmB0

- WORLD OF WORDS’ E-CONTENT FOR ENRICH VOCABULARY:
- https://desaisachin.blogspot.com/2019/07/blog-post.html

- लोकसहभागातून कोरोनो आपत्ती काळात साधलेला शाळेचा क्रांतिकारी शैक्षणिक विकास
- https://youtu.be/I36dRGTi_b4

# परिशिष्ट - ब

मुलांच्या मूल्यमापनासाठी मुलाखत, कसोट्या व निरीक्षण पद्धती वापरण्यात आली. यामध्ये मुलांना काही प्रश्न विचारण्यात आले, काही सूचना देण्यात आल्या. या वापरलेल्या मूल्यमापन साधनातील काही नमुने खालीलप्रमाणे...

- **प्रश्नावली**

१ ) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून दाखव.

२ ) दिलेला मजकूर वळणदार अक्षरात लिहा.

३ ) तुमच्या परिसरात असणाऱ्या व्यावसाईकांची नावे सांगा.

४ ) तुला मोठे झालेवर कोण व्हायचे आहे ?

५ ) चित्राची माहिती सोप्या शब्दात लिहा.

६ ) दिलेल्या शब्द गटातील अशुद्ध शब्द ओळखा.

७ ) तुम्हाला येत असलेला पाढा म्हणून दाखवा.

८ ) खालील इंग्रजी शब्दाचा मराठी मधील अर्थ ओळखा

९ ) बेरीज, वजाबाकी वर आधारित व्यावहारिक जीवनातील शाब्दिक प्रश्न विचारणे.

१० ) तुला माहित असलेली एखादी गोष्ट सांग.

११ ) अडुळसा या वनस्पतीचा उपयोग कोणत्या आजारासाठी होतो ?

१२ ) दाखवलेल्या वस्तूचा आकार कोणता आहे ते सांग.

१३ ) उद्याचा वार कोणता ?

१४ ) ३० दिवस असणारे महिने कोणते ?

१५ ) सुतारकाम करण्यासाठी लागणारी साधने कोणती ?

- **कृती व प्रात्यक्षिक**

१ ) खाली काही व्यावसाईकांची चित्रे दिली आहेत त्यातील तुला आवडणाऱ्या एका व्यक्तीचे चित्र रंगव.

२ ) सुई दोऱ्याच्या मदतीने कापडाला बटण लावून दाखव.

३ ) ठिपके जोडून रांगोळी तयार कर.

४ ) कोड स्कॅन करून माहिती ओपन करा.

५ ) स्क्रू ड्राईव्हरच्या साह्ययाने स्क्रू काढून दाखवा.

६ ) मित्राच्या जखमेवर प्रथोमचार पेटील साहित्य घेऊन मलमपट्टी करा.

७ ) दिलेले इंग्रजी शब्द संगणकावर टाइप करा.

८ ) हेडफोनवर ऑनलाईन गोष्ट ऐका व आपल्या मित्रांना सांगा.

९ ) धुतलेली कपडे पुन्हा इस्त्री न करताही वापरता येण्यासाठी चिमटे लावून दाखवा.

१० ) दिलेल्या कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करून मोठ्या कचरा कुंडीत टाका.

११ ) कराओक संगीत आधारवर गीत गायन करून दाखवणे.

१२ ) पियानो ॲप वर सोप्या गाण्याची चाल वाजवणे.

१३ ) संकलित केलेल्या बातम्या कॅमेरासमोर कथन करून दाखवणे.


१४ ) वाटेवर दिसणारे बोर्ड, माहितीच्या पाट्या वाचणे व माहिती वहीत लिहून काढणे.

# नवोपक्रम सहभागी विद्यार्थी यादी


या नवोपक्रममध्ये शाळेतील इयत्ता २ री च्या सर्व १३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या नवोपक्रमाचा त्यांना सकारात्मक लाभ झाला त्यांची यादी खालीलप्रमाणे........

| अ. क्र. | विद्यार्थी नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | पाटील साईराज सुनिल | |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | २ री |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | २ री |
| ४ | वांजोळे विराज विजय | २ री |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | २ री |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | २ री |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | २ री |
| ८ | संकपाळ शुभम बबन | २ री |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | २ री |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | २ री |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | २ री |
| १२ | संकपाळ शिवन्या शिवाजी | २ री |
| १३ | वांजोळे अथर्व दीपक | २ री |

- ## उपक्रम अंतर्गत फोटो संग्रह



**'शिक्का शाब्बासाकीचा' –** मुलांना प्रबलन देण्यसाठी स्टार व प्रेरणामय शब्दांचे शिक्क्के बनविण्यात आले.



**'पहिले पत्र'-** मुलांना पत्रलेखनाचा प्रत्यक्ष अनुभव यावा, यासाठी मुलांच्याकडून दिवाळी सुट्टीपूर्वी नातेवाईकांना व अधिकाऱ्याना पत्र लिहण्याचा उपक्रम घेण्यात आला. पत्रे टपालपेटीतून पाठवली गेली.



प्रमाणपत्रक

FOUNDATIONAL COURSE FOR LITTLE MASTERS

विद्या मंदिर बशाचामोळा

ता. भुदरगड जि. कोल्हापूर

प्रमाणपत्र देण्यात येते की, कु. ईश्वरी तानाजी गुरव इयत्ता २ री ह्या विद्यार्थीनीने 'दुसरे पाऊल, आनंदी शिक्षणाची चाहूल !' या नवोपक्रम अंतर्गत घेण्यात आलेला फौंडेशनल कोर्स 'अ' श्रेणीसह यशस्वीपणे पूर्ण केला आहे.

दि. २०\११\२०२२

मुख्याद्यापक

विद्या मंदिर बशाचामोळा

**नवोपक्रम अंतर्गत निश्चित केलाला फौंडेशनल कोर्स पूर्ण केल्यानंतर मुलांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले**

# परिशिष्ट - क

## नवोपक्रम अंतर्गत महत्वाच्या कृती

या नवोपक्रम अंतर्गत महत्वाचे, सहज, सुलभ असे नावीन्यपूर्ण आनंददायी शिक्षण देणारे छोटे कृती कार्यक्रम घेण्यात आलेत त्याबाबतची माहिती....

### कृती उपक्रम क्र. १

- **नाव : आम्ही छोटे वार्ताहर, आम्ही छोटे संपादक !**
- **साधने :** कार्डशीट पेपर, कागद, मोबाइल, डींक, स्केचपेन, वृत्तपत्र
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) मुलांना आठवडाभरात शाळेत व गावात घडलेल्या घटनांच्या नोंदी करण्यास सांगणे

२) एखाद्या गोष्टीची माहिती घेण्यासाठी पालकांच्या मोबाईलवर फोटो घेण्यास सांगणे

३) कार्डशीट पेपरचे लहान मोठ्या आकारात आयताकृती तुकडे करणे.

४) मुलांनी फोटो काढले असल्यास शिक्षकांनी त्यांची प्रिंट काढून देणे.

५) वृत्तपत्रातील बातमीचा नमुना दाखवून दिनांक, स्थळ, वार्ताहर, हेडलाईन, माहिती लेखन कसे करतात ? याबाबत मार्गदर्शन करणे.

६) आवश्यक वाटल्यास आवश्यक तिथे दिलेल्या कागदाच्या तुकड्यावर फोटो चिकटवण्यास मुलांना मदत करणे. (फोटोखाली मजकूर लिहण्यास जागा शिल्लक असावी.)

७) फोटो खाली वृतपत्र नमुन्याप्रमाणे हेडलाईनटाकून माहितीचे लेखन करण्यास सांगणे.

८) सर्व कागदाचे आकार लिहून पूर्ण झालेवर पुन्हा हे तुकडे नवीन एका कार्डशीट पेपरवर चिकटवणे.

९) सदर पूर्ण आकाराच्या कार्डशीटवर तयार झालेले बातमी संकलन स्थानिक साप्ताहिक म्हणून प्रदर्शित करणे.

१०) या महत्वाच्या बातम्या व ठळक चालू घडामोडी यांचे क्रोमा पडद्या समोर शूट करून सदर बातमी व्हिडिओ परिपाठ वेळी सर्व मुलांना दाखवणे व यु ट्यूब द्वारे प्रसिद्धी देणे.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांना माहिती संग्रह करण्याची सवय लागते.
  - वाचन, लेखन व संभाषण या कौशल्यांचा विकास होतो.
  - शब्दसंपत्ती वाढते.
  - सामान्यज्ञान वाढते.
  - निर्भीडपणे बोलण्याची क्षमता वाढते.
  - नवनिर्मितीची आवड निर्माण होते.
  - परिसराचे ज्ञान मिळते.

- **लागणारा कालावधी : १ आठवडा**
- **ड्राईव्ह लिंक :**

https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU

## कृती उपक्रम क्र. २

- **नाव : बनवू शब्दांची बाग**
- **साधने :** बागेतील कुंडी, सुकलेली रोपे, तार, डिंक, कात्री, स्केचपेन
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) शालेय परिसरात एखादे रोप सुकले आहे का निरीक्षण करुन त्याचा शोध घेणे.
२ ) फांद्या न मोडता त्यांची वाळलेली पाने काढून टाकणे.
३ ) कार्डशीट पेपर कट करून त्यापासून छोटे छोटे पानांचे आकार तयार करणे.
४ ) कागदाच्या पानावर छोटे छोटे शब्द लेखन मुलांच्याकडून करून घेणे.
५ ) ती पाने डींक वापरून फांदीला विविध ठिकाणी चिकटवणे.
६ ) झाडासारखी रचना होईल असे ज्ञानाचे रोपटे बनवणे.
७ ) शब्दाच्या झाडावर लटकत असलेले शब्द मुलांना वाचण्यास तसेच नोंद करून घेण्यास सांगणे.
८ ) शाळेत असे सुकलेले झाड नसल्यास तार वापरून खोड व फांद्या तयार करून शब्दांचे झाड तयार करणे.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचा मुलांना अनुभव मिळतो.
  - वाचन, लेखन व सृजनशीलतेचा विकास होतो.
  - शब्दसंपत्ती वाढते.
  - नवनिर्मितीचा आनंद मिळतो.
  - शाळेच्या सौंदर्यातही भर पडते.
  - सजीव वनस्पती व निर्जीव वनस्पती यातील भेद समजतो.

- **लागणारा कालावधी : २ तास**

- व्हिडिओ लिंक : https://youtu.be/XK61ULMYEFw




# <u>कृती उपक्रम क्र. ३</u>

- **नाव : मॅजिक कार्डचा वापर**
- **साधने :** कार्डशीट पेपर, कात्री
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) कागदाचे छोटे छोटे तुकडे करणे.
२ ) तुकड्यावर मराठी,- इंग्रजी अक्षरे किंवा अंक लिहणे.
३ ) जे अक्षर कार्डवर लिहिले आहे त्यापासून बनणाऱ्या शब्दांची यादी करणे.
४ ) ते अक्षर वगळून शिक्षकांनी राहिलेला अक्षर समूह फलकावर लिहिणे.
५ ) मुले प्रत्येक अक्षर समूहाला कार्ड जोडून अर्थपूर्ण शब्द बनवतात.
६ ) तयार केलेल्या शब्दांची यादी केली जाते.
७ ) याच प्रकारे अंक कार्डे बनवून तयार होणाऱ्या नवीन संख्येचे वाचन करून घेतले जाते.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - साधे शब्द व जोडशब्द या सर्वांचा सहजपणे सराव घेता येतो.
  - मुलांचा वाचन लेखन सराव होतो.
  - मुलांच्या शब्दसंपत्तीमध्ये वाढ होते.
  - निरीक्षण क्षमता वाढते.
  - संख्याज्ञान दृढ होते.
  - आनंदी वातावरणात कृती खेळातून मुले शिकतात.

- **लागणारा कालावधी : १ तास**
- **व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/FpsMsPFShyU



## कृती उपक्रम क्र. ४

- **नाव : EVM पद्धतीने निवडणूक घेऊन करून वर्गमंत्रीमंडळ स्थापना**
- **साधने** : Tab, VOTING MACHINE APP, तक्ते, शाई, सूचनापट्ट्या, कोरे कागद
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) शिक्षक शालेय मंत्रिमंडळ निवडणूक कार्यक्रम जाहीर करतात.
२ ) इच्छुक मुलांचे अर्ज स्वीकारले जातात.
३ ) निवडणूक प्रसिद्धीपत्रक जाहीर करून सूचना दिल्या जातात.
४ ) मुलांना ॲप द्वारे मतदान कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते.
५ ) मुले TAB वर EVM पद्धतीने मतदान करतात.
६ ) शिक्षकांच्याकडून निकाल घोषित केला जातो.
७ ) निवडून आलेल्या मुलाचा शाळेत सत्कार केला जातो.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांना EVM द्वारे कसे मतदान केले जाते ह्याचे प्रात्यक्षिक ज्ञान व अनुभव मिळतो.
  - लोकशाहीचे स्वरूप लहान वयात समजते.
  - तंत्रज्ञानाची आवड निर्माण होते.
  - मुलांचा भावनिक विकास होतो.
  - मुलांच्यात नेतृत्व गुणांचा विकास होतो.

- **लागणारा कालावधी : १ तास**
- व्हिडिओ लिंक : https://youtu.be/nD1fZjcxl8g




# <u>कृती उपक्रम क्र. ५</u>

- **नाव : टच टू ग्लोबल वल्ड**
- **साधने :** Tab, मोबाईल, Qr Droid App, QR कोड स्टीकर्स, डींक
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) शिक्षक मुलांना उपयुक्त असणाऱ्या संकेतस्थळांची शिक्षकांनी यादी करतात.
२ ) शिक्षक QR DROID ॲपद्वारे या संकेत स्थळांचे QR कोड बनवतात.
३ ) या कोड ची प्रिंट्स काढून त्याची छोट्या आकाराची स्टिकर्स बनवावी.
४ ) QR कोड ची स्टिकर्स प्रत्येक मुलांच्या बेंचवर शिक्षक चिकटवतात.
५ ) स्टीकरवर कोणता कोड कोणत्या माहितीसाठी आहे हे मराठीत लिहिले जाते.
६ ) मुलांना कोड व त्याचे स्त्रोत यांची माहिती देऊन प्रात्यक्षिक घेतले जाते.
७ ) मुलांना Tab किंवा मोबाईलवर सदर कोड स्कॅन करण्याबाबत सूचना दिली जाते.
८ ) मुले कोड स्कॅन करून अभ्यासक्रम आधारित व्हिडिओ पाहतात, गुगल ट्रांसलेटर साईडचा वापर करून इंग्रजी शब्दाचा अर्थ शोधतात, ऑनलाईन गोष्टी ऐकतात, pschool वरील एक्टीव्हीटी सोडवतात.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - तंत्रज्ञानाची आवड व वापरण्याचे कौशल्य प्राप्त होते.
  - QR कोड वापरण्याची माहिती मुलांना मिळते.
  - मुलांच्या ज्ञानात भर पडते.
  - मुलांना शिक्षणात आवड निर्माण होते.
  - शिक्षकांच्या शिवाय मुले स्वतः अध्ययन करतात.
  - मुलांची श्रवण क्षमता विकसित होते.
  - मुलांची निरीक्षण क्षमता वाढते

- **लागणारा कालावधी : १ तास**
- व्हिडिओ लिंक : https://youtu.be/ZSJwrr3giT4



<u>कृती उपक्रम क्र. ६</u>

- **नाव : वाचू वाटेवरच्या पाट्या.**
- **साधने :** नोंदवही, पेन
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१ ) मुलांना गावातील विविध सूचना फलक, बोर्ड, दुकानाच्या पाट्या कुठे आहेत हे निरीक्षण करण्यास सांगणे.

२ ) पाटीवरील मजकूर नोंदवहीत लिहून घेण्यास सांगणे.

३ ) संकलित मजकूर मधील नवीन व अवघड वाटणाऱ्या शब्दांची स्वतंत्र यादी करण्यास सांगणे.

४ ) मुलांना त्या शब्दाचा अर्थ सांगणे शिवाय शिक्षकांनी त्या शब्दाचे श्रुतलेखन करून घेणे.

५ ) सूचनांची नोंद केली असेल तर ती सूचना तुम्ही पाळता का ? असा (होय / नाही) प्रश्न मुलांना विचारणे.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांना सूचना पालनाची सवय लागते
  - मुलांच्या शब्दसंपत्तीमध्ये भर पडते.
  - मुलांची निरीक्षण क्षमता वाढते.
  - मुलांचा सामाजिक विकास होतो.
  - मुलांचा लेखन विकास होतो.

- **लागणारा कालावधी : १ तास**
- ड्राईव्ह लिंक : https://drive.google.com/drive/folders/1p0WD_Z1CxMahNjokEC4o2uadVaFvk2lz?usp=sharing



# परिशिष्ट - ड

## नवोपक्रम बाबत आलेल्या बातम्या

रयतेचा कैवारी

डिजिटल शैक्षणिक दैनिक

बाल रक्षक

संपादक : शाहू संभाजी भारती ( दैनिक रयतेचा कैवारी, वर्ष चौथे, अंक ०५१, एकूण अंक १०२६) सोमवार दि.२८/११/२०२२ पान १०

## दुसरे पाऊल, आनंदी शिक्षणाची चाहूल !!

### - इयत्ता २ री विशेष नवोपक्रम

### सर्वांगीण विकास साधणारा नवोपक्रम




इयत्ता १ ली ही कक्षा जर शिक्षणामधील पहिले महत्वपूर्ण पाऊल असेल तर इयत्ता २ री कक्षा देखील नक्कीच दुसरे महत्वपूर्ण असे पाऊल असल्याची जाणीव प्रत्येक शिक्षकाला असायलाच हवी. पहिलीमध्ये दाखल झालेल्या मुलाचा 'शैक्षणिक पाया मजबूत करणे' हे मुख्य उद्दिष्ट राहते आणि तेच मूल दुसरीच्या वर्गात प्रवेश केल्यावर त्याला बोध झालेल्या त्या सर्व क्षमता व कौशल्ये दृढ होणे खूप आवश्यक असते. शिवाय हा अध्ययन प्रवास आनंददायी व शिक्षणाची गोडी वाढणारा असणे खूप आवश्यक आहे. 'शिकणे' हा मुलाचा जितका नैतिक अधिकार आहे तितकेच ते शिक्षण आनंददायी करणे, मुलांना शिकण्यात आवड निर्माण करणे म्हणूनच त्यास अनुकूल वातावरण तयार करणे हे आपले शैक्षणिक कर्तव्य आहे.

या दुसऱ्या महत्वपूर्ण टप्प्यात मुलांच्यात किमान अध्ययन क्षमता प्राप्ती बरोबरच मुलांच्यामध्ये ज्ञान शोधण्याची वृत्ती, आत्मविश्वास, मुल्याशिक्षण यासह जीवनकौशल्यांचेही पायाभूत व प्राथमिक ज्ञान यांचे संक्रमण होणे खूप आवश्यक आहे. दुसरीच्या वर्गात आलेले मूल वाचायला शिकलेले असते पण योग्य गतीत व योग्य आरोह-अवरोहसह, आत्मविश्वासपूर्वक वाचता येणे, योग्य गतीत वाचता येणे आता आवश्यक असते.

मूल लिहायला शिकले असते पण हे लेखन सुलेखन असणे, शुद्ध व प्रमाणबद्ध लिहायला शिकणे या टप्प्यात गरजेचे असते. याशिवाय हे मूल बोलायला, विचार व्यक्त करायला शिकले असते पण हे विचार आत्मविश्वासपूर्वक मांडणे, प्रत्येक गोष्टीमागील कारणांचा स्वतःहून शोध घेणे आदी गुणांचा विकास होणे खूप आवश्यक असते. सर्वात महत्वाचे म्हणजे बालकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण याच काळात होत असल्याने मुलांच्या मनावर चांगल्या विचारांचा प्रभाव टाकणे, मुलांच्यात सुसंस्कार रुजतील असे वातावरण निर्माण करणे आवश्यक ठरते.

एकप्रकारे मुलाच्या शिक्षणप्रवासातील या दुसऱ्या कक्षेत एका आनंदी वातावरणात मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याचा विशेष प्रयत्न करणे पुढील शैक्षणिक वाटचालीच्या दृष्टीने अत्यावशक ठरते. याच विचारप्रणालीमधून या सर्व गोष्टींची साध्यता सुयोग्य वातावरण करून देणारा नवोपक्रम म्हणजे 'दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल'.

विद्यार्थी जडणघडणीच्या अर्थात आकार देण्याच्या काळात मुलांच्यात अपेक्षित वर्तनबदल या नवोपक्रमामुळे साध्य करता आला. सर्वात महत्वाचे म्हणजे, हे सर्व मुलांना एका विशिष्ट आनंदी वातावरणात देऊ शकतो, मुले आनंदात सर्व गोष्टी साध्य करू शकतात. शिक्षणातून मिळणारा आनंद हा नवीन शिक्षण घेण्यास रुची वाढवणारा व अध्ययन प्रक्रिया सहज सुलभपणे होण्यास साह्यभूत ठरते, हे मी नवोपक्रमाच्या अनुभवातून साध्य केले आहे. या उपक्रमांतर्गत सुंदर माझे अक्षर, माझी शब्दबाग, गोष्टी गणिताच्या, टच टू ग्लोबल वर्ल्ड, शाळा भरली बांधावर, मॅजिक कार्ड्स, फॉउंडेशनल कोर्सेस, लिटल रिपोर्टर, शिक्का शाब्बासकीचा, प्लास्टिकमुक्त रविवार आदी.

विद्यार्थी उपयुक्त उपक्रम राज्यभरात अनुकरणीय ठरत आहेत. या उपक्रमांतर्गत घेतलेल्या सरप्राइज टेस्टचा लाभही राज्यातील हजारो शाळांनी घेतला आहे.

अशाप्रकारे प्रारंभिक स्तरावर असताना मुलांच्यामध्ये अपेक्षित असणारी शैक्षणिक, बौद्धिक, भावनिक सामिजिक उद्दिष्टे साध्य करण्याचा दृष्टीने योग्य वातावरणात पायाभरणी करण्याचे कार्य या नवोपक्रमामुळे प्रत्येक बालकात साध्य होते. २१ व्या शतकातील आव्हांनाना सामोरे जाणाऱ्या या भावी पिढीला तंत्रज्ञानाची कास धरण्याची व भविष्याचा वेध घेण्याच्या विचारप्रणालीचे एक प्रकारे बीजारोपण घालण्याचे काम या नवोपक्रमातून साध्य होऊ शकले. सर्वांच्यासाठी दिशादर्शक आणि अनुकरणीय असा हा नवोपक्रम बालकाचा सर्वांगीण विकास साधताना त्याला परिसराची जाणीव, मुलभूत जीवनकौशल्यांची ओळख व मनावर सुसंकार बिंबवण्याचे कार्य या नवोपक्रमामधून सहजपणे साध्य झाले. पालक व समाज यांच्या सहकार्यातून यशस्वी ठरत असलेला नवोपक्रम म्हणजे एकप्रकारे शिक्षणरुपी बागेतील त्या सर्व कळ्यांना फुलण्यास व खुलण्यास आल्हाददायक वातावरण निर्माण करुन देणारा आहे.

**श्री. सचिन देसाई**

**वि.मं.बशाचामोळा**

**(राज्यस्तरीय नवोपक्रम पुरस्कारप्राप्त शिक्षक)**

# शाळेतील उपक्रमांची वृत्तपत्रांनी घेतलेली दाखल

## बशाचामोळा शाळा बनली स्मार्ट स्कूल

### तालुक्यातील स्मार्टबोर्डयुक्त पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा

कडगाव, ता. १८ : बशाचामोळा (ता. भुदरगड) येथील प्राथमिक शाळास्मार्ट स्कूल बनली आहे. मुंबई येथील रश्मीज् स्माइल ट्रस्टने शाळेस स्मार्ट बोर्ड (टचस्क्रीन बोर्ड), प्रोजेक्टर, संगणक संच व इतर उपयुक्त शैक्षणिक साहित्य दिले. स्मार्टबोर्ड सुविधा असणारी तालुक्यातील पहिलीच जिल्हा परिषदेची शाळा आहे.



बशाचामोळा : शाळेस भेटवस्तू देताना रश्मीज् स्माइल ट्रस्टचे सदस्य.

सध्या शाळा व शिक्षण स्मार्ट होत आहे. अनेक शाळांत डिजिटल स्मार्ट बोर्ड बसवले आहेत; पण याकरिता मोठ्या आर्थिक साहाय्याची आवश्यकता असते. भुदरगड तालुक्यात अद्याप कोणत्याही जिल्हा परिषद शाळेत अशी सुविधा नाही; परंतु बशाचामोळा येथे पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेत ही स्मार्ट बोर्ड सुविधा प्राप्त झाली. रश्मीज् स्माइल ट्रस्टतर्फेशाळेसाठी व मुलांसाठी नवीन दप्तरे, पुस्तके व इतर उपयुक्त साहित्य असे एक लाख वीस हजार किमतीचे साहित्य भेट दिले.

मुख्याध्यापक सचिन देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संभाजी पाटील, डॉ. भावना कुचेरिया, डॉ. सुहास कुचेरिया, भावना शहा, धरमशी पटेल, हिना पटेल, दीपा ठक्कर यांचे सहकार्य लाभले.

सरपंच निशा संकपाळ, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विश्वनाथ पाटील, एकनाथ पाटील, आनंदा ढोकरे, संतोष पाटील, मारुती पोवार, पांडुरंग पाटील, व्ही. एम. पाटील, अक्षय पाटील आदी उपस्थित होते. दिग्विजय कोटकर यांनी आभार मानले.

**दोन लाखांहून अधिक मदत**

मुख्याध्यापक सचिन देसाई हे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत. त्यांनी लॉकडाउन काळात केलेल्या कौतुकास्पद कार्याचा आदर्श राज्यभरातील शिक्षक घेत आहेत. देशभरातून अनेक शिक्षकांनी या शाळेस स्वेच्छेने दोन लाखांहून अधिक मदत पाठवली आहे.

---

सकाळ



कूर (ता. भुदरगड): येथे सचिन देसाई यांचे पुस्तक प्रकाशन दिव्यांग विद्यार्थ्याच्या हस्ते झाले या वेळी मान्यवर.

## 'बालकांचे वक्तृत्वविश्व'चे प्रकाशन

कोनवडे : केंद्रशाळा कूर (ता. भुदरगड) येथे सचिन देसाई यांच्या 'बालकांचे वक्तृत्वविश्व' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कूर येथील दिव्यांग श्रेयश सर्जेराव कांबळे याच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. पुस्तकात देशभक्तिपर भाषणांचा संग्रह असून विशेष बाब म्हणजे क्यूआर कोड सुविधा सुविधा असलेले हे पुस्तक आहे. यातील प्रत्येक भाषणासोबत क्यूआर कोड दिले असून तो स्कॅन करताच भाषण उत्कृष्ट व्हिडिओ स्वरुपात पाहण्याची व्यवस्था आहे. मुलांच्यात भाषण करण्याची आवड, कला व आत्मविश्वासही वाढेल असा सचिन देसाई यांना विश्वास आहे. निवृत्त केंद्रप्रमुख सदाशिव डवरी, डी.डी.पाटील, मोहन घाडगे, शशिकांत पाटील, पी. डी. कांबळे, दयानंद म्हेतर, एकनाथ कुंभार, आनंदा उगले, विलास कांबळे, सुनीता कांबळे, शोभा हळदकर, नंदकुमार पाटील, सर्जेराव कांबळे उपस्थित होते.

Kolhapur, Main
11/07/2022 Page No. 2

---

सकाळ

## स्वतःचे मूल्यमापन स्वतःच करा

### मुळे; 'इनरव्हील क्लब सनराईज'तर्फे प्रेरणादायी शिक्षक पुरस्कार

कोल्हापूर, ता. १८ : दुसरे कोणी आपली परीक्षा घेण्यापेक्षा स्वतःचे मूल्यमापन स्वतःच करा, असे आवाहन माजी सनदी अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांनी आज येथे केले.

इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर सनराईजतर्फे प्रेरणादायी शिक्षक पुरस्काराच्या वितरणप्रसंगी ते बोलत होते. महावीर उद्यान परिसरातील रोटरीच्या सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर सनराईजतर्फे आदर्श शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सत्कार माजी सनदी अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते झाला. यावेळी डॉ. के. टी. जाधव, स्वाती गायकवाड, श्रीकांत पाटील, गीता पाटील, सोनाली पाटील.

मुळे म्हणाले, "शिक्षक ज्ञान द्यायला तयार असतो. विद्यार्थी घेतो किती, हे पाहणे महत्त्वाचे आहे. जुने शिक्षक वेगळ्या विचारधारेचे होते. माझ्या आयुष्याच्या प्रवासात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. आमची पिढी शाळेला जाणारी पहिली होती. त्या काळी पायात चप्पल घालण्याची प्रथा नव्हती. परिस्थिती बेताची होती, असेही काही नव्हते. त्या काळात शिक्षक विद्यार्थ्यांच्या आवाजावरून विद्यार्थ्यांचे नाव सांगायचे. एक शिक्षक तर विद्यार्थ्यांचे पाय पाहून त्याचे नाव सांगायचे. शिक्षकांविषयी मनाच्या तळघरातील आठवणी विलक्षण आहेत.

त्यांचा विद्यार्थ्यांशी संवाद होता. तसेच विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही ऋणानुबंध कायम असायचा. हे चित्र आजही पाहायला मिळते." सचिन देसाई, संभाजी चौगले, विनोदकुमार भोंग, रोहिणी शिंदे, जैनब शेख, मिलिंद यादव यांना पुरस्काराने गौरविले. निबंध स्पर्धेतील विजेत्या स्मिता माळी, ऊर्मिला तेली, निर्मला जगताप, सीमा खोत, युवराज पाटील, तर गायन स्पर्धेतील विजेते अमय पोतदार, राजवर्धन तगारे, अमर चोपडे, अमरसिंह संघवी, स्वरा आकोळकर यांना बक्षिसे देण्यात आली. सनराईजच्या अध्यक्ष सोनाली पटेल, पोलिस उपअधीक्षक स्वाती गायकवाड, साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. के. टी. जाधव उपस्थित होते. संयोगीता महाजन व अमृता परेख यांनी सूत्रसंचालन केले. मंजिरी देवाणावर यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
19/09/2022 Page No. 3